cmyk

## संपादकीय

### सरकार आरक्षणाच्या चक्रव्यूव्हात

महाराष्ट्र सध्या मराठा विरुद्ध ओबीसी संघर्ष अनुभवतो आहे आणि राज्यातले महायुती सरकार या आरक्षणाच्या चक्रव्यूहात पुरते अडकले आहे. महाराष्ट्र जे अनुभवतो आहे तेच आता बिहारलाही अनुभवावे लागण्याची शक्यता आहे. आरक्षणाच्याच मुद्यावरून मणिपूरमधील संघर्ष हिंसाचाराच्या पातळीवर गेला आहे व वर्षभरापासून ही हिंसाचाराची आग काही केल्या थंड व्हायला तयार नाही. यामागे कारण आहे ते आरक्षणासाठी सर्वोच्च न्यायालयाने आखलेली ५० टक्क्यांची कमाल मर्यादा. या पन्नास टक्क्यांच्या मर्यादेस समानतेच्या तत्त्वास छेद जाऊ नये या जाणिवेचा संदर्भ आहे.


# दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड - महाराष्ट्र | वर्ष - ४ | अंक-७५ | मंगळवार दि.२५ जून २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | • पाने- ६ | किंमत ३ रूपये


### सर्वोच्च न्यायालयाने केजरीवालांना दिला सबुरीचा सल्ला

नवी दिल्ली : दिल्लीतील कथित मद्य धोरण प्रकरणातील मनी लॉंड्रिंग प्रकरणी अटक असलेले दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या जामीन अर्जावर तत्काळ सुनावणीस सोमवारी (दि. २४) सर्वोच्च न्यायालयाने नकार दिला. तसेच दिल्ली उच्च न्यायालयाच्या निर्णयाची संयमाने प्रतीक्षा करावी, असा सल्लाही सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. अरविंद केजरीवाल यांना गुरुवारी राऊस एव्हेन्यू न्यायालयाने जामीन मंजूर केला होता. या आदेशाविरोधात सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) दिल्ली उच्च न्यायालयात धाव घेतली. या प्रकरणी उच्च न्यायालयातील सुनावणी पूर्ण होईपर्यंत त्यांच्या जामिनाला स्थगिती देण्यात आली होती.

# राज्यात दुध दरावरून आंदोलन पेटणार!

## शेतकऱ्यांच्या सोबतीने राष्ट्रवादी - काँग्रेस रस्त्यावर उतरणार, शरद पवार आज घेणार शेतकऱ्यांची बैठक

**पुणे । प्रतिनिधी**

**राज्यात गेल्या काही दिवसापासून दुधाचे सतत पडत आहेत. त्यामुळे दूध उत्पादक शेतकरी चांगलाच अडचणीत सापडला आहे. राज्य सरकारने जाहिर केलेले अनुदान देखील दूध उत्पादकांना मिळत नसल्याने शेतकरी संतापले आहेत. तर राज्य सरकारने दुधाच्या प्रश्नात लक्ष घालावे अशी मागणी दूध उत्पादक करत आहेत. मात्र सरकारला दुधाच्या प्रश्नाचे किंवा दूध उत्पादकांच्या प्रश्नाकडे लक्ष देण्यात रस नसल्याचे चित्र सध्या आहे. पण आता शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस गटाचे जेष्ठ नेते खासदार शरद पवार यांनीच यात लक्ष घालण्याचे ठरवले आहे. पवार बुधवारी (ता.२६) दूध उत्पादकांनी संवाद साधणार आहेत. दरम्यान, दूध उत्पादक शेतकऱ्यांना दूधाचे दर वाढवून द्यावेत, अन्यथा शेतकऱ्यांना न्याय देण्यासाठी रस्त्यावर उतरावे लागेल, असा इशारा काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनीही दिला आहे.**

राज्य सरकारच्या आडमुठे व शेतकरी विरोधी धोरणांमुळे दुधाचे दर कोसळले आहेत. दुधाला अत्यल्प दर मिळत आहे. त्यामुळे दूध उत्पादकांना तारेवरची कसरत करावी लागत आहे. तर राज्यात दुधाचे दर आणि दुधाच्या अनुदानात वाढ करावी अशी मागणी दूध उत्पादकांकडून केली जात आहे. मात्र या मागणीवर सरकारकडून कोणतीच कार्यवाही होताना दिसत नाही. उलट दूध उत्पादकांमध्ये रोष वाढत आहे. त्यावरून शरद पवार यांनी दूध उत्पादकांशी चर्चा करण्याचे ठरवले





आहे. याबाबत पवार यांनी बुधवारी दूध उत्पादकांची बैठक बोलावली असून दुधाच्या दरात या बैठकीत चर्चा होणार आहे. याआधी देखील पवार यांनी दुधाच्या दरावरून सरकारला इशारा दिला होता. तसेच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पत्र लिहत दूध उत्पादकांना अनुदान द्या, अशी मागणी केली होती. तसेच राज्य सरकार दुग्ध उत्पादक शेतकऱ्यांना अनुदान देण्यात अपयशी ठरल्याची टीका करताना, दूध उत्पादकांना अनुदान न दिल्यास रस्त्यावर उतरू असे म्हटले होते. तर जनतेचे प्रश्न सोडवायचे असतील तर राज्यातील सरकार बदलणे गरजेचे असल्याचेही पवार म्हणाले होते. तसेच खासदार सुप्रिया सुळे यांनी देखील जीएसटी कौन्सिलच्या बैठकीवरून रविवारी (ता.२३) केंद्र सरकारवर जोरदार निशाणा साधला. कौन्सिलने सर्व दुधाच्या गाड्यांवर १२ टक्के एकसमान दर ठेवण्याची शिफारस केली आहे. त्यामुळे स्टील, लोखंड, ॲल्युमिनियम, दूध पॅकिंगसाठी जे काही वापरले पान २ वर

# पंकजा मुंडेबाबत आक्षेपार्ह पोस्ट करणाऱ्या युवकास अटक

## » परभणी पोलिसांनी उचलून परळीत स्वाधीन केले





**बीड । प्रतिनिधी**

यंदा प्रथमच बीड जिल्ह्यातील लोकसभा निवडणुकीत जातीय रंग पाहायला मिळाला. जातीय तेढ निर्माण झाल्यानेच पंकजा मुंडेंचा पराभव झाल्याचे बोलले जात आहे. त्यातच, पराभवानंतर मुंडेंच्या समर्थकांनी मोठी निराशा व्यक्त केली. जिल्ह्यात काही ठिकाणी आत्महत्येच्याही घटना घडल्या आहेत. मात्र, दरम्यानच्या काळात पंकजा मुंडेंबाबत आक्षेपार्ह पोस्ट केल्यामुळे तणाव निर्माण झाला होता. काही, तालुक्यात बंदही पुकारण्यात आला. आता, परभणी पोलिसांनी पंकजा मुंडेंविरुद्ध आक्षेपार्ह पोस्ट करणाऱ्या युवकाला अटक केली आहे. त्यास परळी पोलिसांच्या स्वाधिन करण्यात आले आहे.

पान २ वर

### » जिंतूर बंदची हाक

परभणीच्या जिंतूर तालुक्यातील एका तरुणानं पंकजा मुंडे यांच्याबाबत सोशल मीडियावर आक्षेपार्ह कमेंट केल्यामुळे वाद निर्माण झाला. त्याच्या निषेधार्थ ओबीसी समाजाच्यावतीने जिंतूर बंदची हाक देण्यात आली होती. सोबवारी सकाळी आठ वाजल्यापासून जिंतूर शहरातील सर्व बाजारपेठा कडकडीत बंद ठेवण्यात आल्या आहेत. कमेंट करणारा तरुण हा अल्पवयीन असून त्याच्यावर जिंतूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी त्याला ताब्यात घेतलं आहे. सध्या जिंतूरमध्ये शांतता असून मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

# भगवानगडासाठी वनविभागाची ४ हेक्टर जमीन हस्तांतरणास मंजूरी

## *कृषिमंत्री धनंजय मुंडे यांचा यशस्वी पाठपुरावा*

**रुग्णालय, सामाजिक प्रशिक्षण केंद्र, यात्री निवास, वाहनतळ इत्यादी कामे केले जाणार**

**केंद्रीय वन विभागाचे व राज्याचे वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांचे मुंडेंनी मानले आभार**

**मुंबई । प्रतिनिधी**

**श्रीक्षेत्र भगवानगडाच्या विविध विकास कामांसाठी भगवानगड ट्रस्टला लागून असलेली वनविभागाची चार हेक्टर जमीन भगवानगडाला हस्तांतरित करण्याचा प्रस्ताव कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्या प्रयत्नातून महाराष्ट्र राज्य वन विभागाचे मंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या माध्यमातून केंद्रीय वन विभागाकडे पाठवला होता. त्यास आज केंद्रीय वन विभागाने मान्यता दिली आहे.**






भगवान गडाचे महंत न्यायाचार्य, ह. भ. प. डॉ. नामदेव महाराज शास्त्री यांनी सदर जमीन वन विभागाकडून हस्तांतरित करून भगवानगडाच्या विकास कार्यासाठी पान २ वर

### कॅनडाच्या संसदेत दहशतवादी निज्जरला वाहिली श्रद्धांजली

टोरंटो: कॅनडाच्या संसदेत खलिस्तानी दहशतवादी हरदीप सिंह निज्जरला श्रद्धांजली वाहिल्यानंतर आता भारताकडून प्रतिक्रिया आली आहे. भारताचे परराष्ट्र मंत्री एस जयशंकर यांनी कनिष्क विमान अपघाताचा उल्लेख करुन दहशतवादाच्या मुद्यावरून कॅनडाला आरसा दाखवला. कनिष्क विमान अपघाताच्या ३९ व्या स्मृतिदिनानिमित्त भारताचे परराष्ट्र मंत्री एस जयशंकर यांनी त्या घटनेत मृत्युमुखी पडलेल्यांना श्रद्धांजली पान २ वर

### बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२४ जून २०२४**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| आवक | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू : ३.५० क्विंटल | २,३५० | २,७१० | २,५३० |
| ज्वारी/हायब्रिड : १३.०० क्विंटल | २,३५१ | २,४०० | २,३८३ |
| मूग : १.०० क्विंटल | ७,२७६ | ७,५०१ | ७,३८८ |
| तूर : २.५० क्विंटल | ८,४०० | ८,४०० | ८,४०० |
| उडीद : ९.५० क्विंटल | २,३३२ | २,६०० | २,४४४ |
| बाजरी: १५.५० क्विंटल | २,२०१ | २,८०१ | २,५०२ |
| चिंच/लोकल: ४७.०० क्विंटल | १,७०० | ६,३०० | ४,००० |
| सोयाबीन: १०३.०० क्विंटल | ४,४२५ | ४,५५१ | ४,४९७ |
| हरभरा: २.५० क्विंटल | ५,९८० | ५,९८० | ५,९८० |

# अजितदादांच्या आमदारांबाबत शरद पवारांची गुगली!

## सवालही पैदा नही होता म्हणणाऱ्या पवारांनी शब्द फिरवला



**मुंबई । प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीत जित पवारांच्या राष्ट्रवादीला अपयश आले. त्यामुळे अजित पवारांसोबतचे बरेच नेते व आमदार अस्वस्थ असल्याचे बोलले जात आहे. अजित पवारांसोबतचे नेत्यांना घरवापसी करु वाटली तर त्यांना पुन्हा पक्षात घेणार का असा सवाल राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार यांना विचारण्यात आला होता. त्यावर सवालही पैदा नही होता, अशी प्रतिक्रिया शरद पवारांनी दिली होती. मात्र आता पवारांनी अजितदादांच्या आमदारांबाबत गुगली टाकली आहे. त्यांनी शब्द फिरवला असून अजित दादांसोबत गेलेल्या सर्वच आमदारांना प्रवेश बंदी असे नाही, अशी माहिती शरद पवारांनी माहिती एका वृत्तवाहिनीशी बोलताना दिली आहे.

विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष नव्या चेहऱ्यांना संधी देणार आहे. पक्षाकडे नवे चेहरे उमेदवारीसाठी येत असून जास्तीत जास्त नव्या चेहऱ्यांना संधी देऊ अशी माहिती शरद पवारांनी दिली आहे. तसेच अजित दादांसोबत गेलेल्या सर्वच आमदारांना प्रवेशबंदी नाही, असे सांगून शरद पवारांनी अजितदादांच्या आमदारांबाबत गुगली टाकली आहे. तसेच अजित पवार गटातील आमदार आमच्यासोबत यायला इच्छुक आहे. अनेक आमदारांनी शरद पवारांची देखील भेट देखील घेतली आहे. पावसाळी अधिवेशन तोंडावर आहे. अर्थसंकल्पीय अधिवेशनात निधी वाटप पूर्ण झाल्यानंतर येऊ असं आमदारांकडून आश्वासन देण्यात आल्याची माहिती शरद पवारांनी दिली आहे.

### शरद पवारांचे सूचक वक्तव्य

लोकसभा निवडणुकीत अजित पवारांच्या राष्ट्रवादीला अपयश आले. त्यामुळे अजित पवारांसोबतचे बरेच नेते अस्वस्थ असल्याचे बोलले जात आहे. अजित पवारांसोबतचे नेत्यांना घरवापसी करु वाटली तर त्यांना पुन्हा पक्षात घेणार का असा सवाल राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार यांना विचारण्यात आला होता. त्यावर सवालही पैदा नही होता, अशी प्रतिक्रिया शरद पवारांनी दिली होती. आता मात्र शरद पवारांनी सर्वच आमदारांना प्रवेशबंदी नाही असे म्हणत गुगली टाकली आहे. अजित पवारांसोबत जाणाऱ्या आमदारांची संख्या जास्त होती. मात्र शरद पवारांवर टीका करणाऱ्यांची संख्या कमी आहे त्यामुळे इतरांचा विचार केला जाईल अशा प्रकारचे सूचक वक्तव्य करण्यात आले आहे.

# जातीपातीचे विष कालवणाऱ्यांना दुर ठेवा

## राजकारणावरुन राज ठाकरेंचा महाराष्ट्राला सल्ला



**मुंबई । प्रतिनिधी**

मराठा आरक्षणाची मागणी करणारे मनोज जरांगे पाटील आणि ओबीसी आरक्षणाला धक्का लागता कामा नये यासाठी आंदोलन करणारे ओबीसी नेते लक्ष्मण हाके मागील काही दिवसांपासून सातत्याने एकेमेकांविरोधातील दावे-प्रतिदावे करत आहेत. याच पार्श्वभूमीवर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरेंना पत्रकारांनी प्रश्न विचारला. या प्रश्नाला उत्तर देताना राज ठाकरेंनी महाराष्ट्रामध्ये उत्तर प्रदेश-बिहारसारखी परिस्थिती निर्माण होईल पान २ वर

### अशा लोकांना महाराष्ट्राने दूर ठेवले पाहिजे

मला काल कोणीतरी क्लिप दाखवली ज्यात लहान लहान मुलं जातीबद्दल बोलत आहेत. हे कधी बोललो होतो मी की हे (जातीपातीचं) प्रकरण शाळा-कॉलेजांपर्यंत जाणार. हे विष कधी महाराष्ट्रामध्ये नव्हते. जातीपातीमध्ये विष कालवणाऱ्या लोकांना महाराष्ट्राने दूर ठेवले पाहिजे, असे राज ठाकरे म्हणाले.

### पुढच्या पिढ्यांनी कसे जगायचे?

तसेच पुढे बोलताना राज ठाकरेंनी, कितीही आवडता पक्ष असो किंवा व्यक्ती असो हे असले विष कालवणार असतील तर पुढच्या पिढ्यांनी कसे जगायचे? काय होणार महाराष्ट्राचं? मी नेहमी सांगत आलो, उत्तर प्रदेश बिहारमध्ये ज्या गोष्टी सुरु आहेत तसे महाराष्ट्रात सुरु होईल. यावरुन खूनखराबे सुरु होतील, अशी भीती देखील बोलून दाखवली.

# संसद अधिवेशनाला सुरुवात, खासदारांचा शपथविधी

## इंडिया आघाडीकडून संसदेच्या प्रांगणात राज्यघटनेची प्रत घेऊन निदर्शने

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

केंद्रातील एनडीए सरकारच्या सत्ता स्थापनेनंतर पहिल्या पावसाळी अधिवेशनाला सोमवार पासून सुरुवात झाली. सकाळी अधिवेशाला सुरुवात झाल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संसदेच्या बाहेर औपचारिक मनोगत व्यक्त केले. त्यानंतर संसदेच्या कामकाजाला सुरुवात झाली. यावेळी केंद्रीय मंत्रिमंडळात समाविष्ट असलेल्या खासदारांचा पहिल्यांदा शपथविधी पार



पडला. मात्र केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान हे खासदारकीची शपथ घेण्याकरीता आल्यानंतर इंडिया आघाडीच्या सदस्यांनी नीट.. नीट.. नीट.. अशा घोषणा दिल्या.

संसदेत प्रवेश करताना इंडिया आघाडीच्या सदस्यांनी हातात राज्यघटनेची प्रत घेऊन निदर्शने केली. विशेष म्हणजे सत्ताधारी पक्षाच्या समोरच्या बाजूला इंडिया आघाडीचे नेते राहुल गांधी, अखिलेश यादव यांच्यासह अयोध्येत भाजपा उमेदवाराचा पराभव करत विजयी झालेले समाजवादी पार्टीचे अवधेश प्रसाद आदी नेते पहिल्या बाकावर पान २ वर

### मोदींच्या भाषणावर प्रश्नचिन्हे

अधिवेशनापूर्वीच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या भाषणावर काँग्रेसने प्रश्न उपस्थित केले. पंतप्रधान मोदींकडे देण्यासारखे नवीन काहीच नाही. नेहेमीप्रमाणे ते दुसऱ्याच मुद्यावर लोकांचे लक्ष नेत आहेत, अशी टीका काँग्रेसचे सरचिटणीस जयराम रमेश यांनी केली. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे म्हणाले, मोदीजी महत्त्वाच्या मुद्द्यांवर काहीतरी बोलतील, अशी देशाला आशा होती. नीट आणि इतर भरती परीक्षांमधील पेपरफुटीवर बोलतील, अशी आशा होती. पण, त्यांच्या सरकारच्या हेराफेरी आणि भ्रष्टाचाराबाबत त्यांनी कोणतीही जबाबदारी घेतली नाही. पश्चिम बंगालमधील रेल्वे अपघाताबाबतही मोदींनी मौन बाळगले. मणिपूर गेल्या १३ महिन्यांपासून हिंसाचाराच्या विळख्यात आहे, पण मोदीजी तिथे गेले नाहीत किंवा त्यांच्या आजच्या भाषणात हिंसाचाराबद्दल चिंता व्यक्त केली नाही. अशी टीका त्यांनी केली.

cmyk

## अग्रलेख

# सरकार आरक्षणाच्या चक्रव्यूव्हात

महाराष्ट्र सध्या मराठा विरुद्ध ओबीसी संघर्ष अनुभवतो आहे आणि राज्यातले महायुती सरकार या आरक्षणाच्या चक्रव्यूहात पुरते अडकले आहे. महाराष्ट्र जे अनुभवतो आहे तेच आता बिहारलाही अनुभवावे लागण्याची शक्यता आहे. आरक्षणाच्याच मुद्यावरून मणिपूरमधील संघर्ष हिंसाचाराच्या पातळीवर गेला आहे व वर्षभरापासून ही हिंसाचाराची आग काही केल्या थंड व्हायला तयार नाही. यामागे कारण आहे ते आरक्षणासाठी सर्वोच्च न्यायालयाने आखलेली ५० टक्क्यांची कमाल मर्यादा. या पन्नास टक्क्यांच्या मर्यादेस समानतेच्या तत्त्वास छेद जाऊ नये या जाणिवेचा संदर्भ आहे. घटनाकारांनाही याची जाणीव होती व त्यांनी तसा इशाराही दिला होता. मात्र, आपल्या देशात आरक्षण हा सामाजिक नव्हे तर राजकीय मुद्दा बनवला गेला आणि त्यास दुर्दैवाने सर्वच राजकीय पक्षांनी आपापल्या क्षमतेनुसार हातभारच लावला. मोदी सरकारनेही आर्थिक मागासांना दहा टक्के आरक्षण देऊन ५० टक्क्यांच्या मर्यादेचे उल्लंघन केलेले आहेच.

बिहारच्या बाबतीत जातनिहाय जनगणनेचा आधारही न्यायालयाने स्वीकारला नाही. कायद्यापुढील समानता, सार्वजनिक सेवांमधील समान संधी याबाबत राज्यघटनेतील कलमांचे उल्लंघन होत असल्याकडेही न्यायालयाने लक्ष वेधले आहे. यामुळे आरक्षणाची टक्केवारी वाढविण्याची मर्यादा आणि त्यामुळे होत असलेली आरक्षण कोंडी पुन्हा एकवार अधोरेखित झाली आहे. नितीशकुमार सरकारकडे या निर्णयास सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्याचा पर्याय उपलब्ध आहे व ते त्याचा नक्कीच वापर करतील. सर्वोच्च न्यायालयात त्यावर सविस्तर खल होईलही. मात्र, तूर्त 'बिहार पॅटर्न' राबवून आरक्षणाची विविध जातगटांची मागणी पूर्ण करण्याचा मनसुबा ठेवणाऱ्या विविध राज्यांतील सरकारांना जोरदार धक्का बसला आहे आणि त्यात महाराष्ट्रातील महायुती सरकारचाही समावेश आहे. कारण या सरकारने मराठा समाजाला स्वतंत्र दहा टक्के आरक्षण देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी सर्वेक्षणाचा आधार घेतल्याचा दावा सरकार करते आहे व हे आरक्षण कोर्टात टिकेल असेही सांगत आहे. मात्र, पाटणा उच्च न्यायालयाच्या निर्णयाने आरक्षणाचा टक्का वाढविण्याच्या मर्यादेची कोंडी सुस्पष्ट केली आहे. खरं तर विविध समाजघटकांकडून आरक्षणाची मागणी टोकदार होण्यामागे शेतीतील अनिश्चितता, बेरोजगारी, खासगी नोकऱ्यांमधील शोषण आणि नोकरीची अनिश्चितता, खासगी शिक्षणातील पैसेवाल्यांची मक्तेदारी व तेथे होत असलेले आर्थिक शोषण, समाजात दिवसेंदिवस वाढत चाललेली आर्थिक दरी व विषमता अशी अनेक कारणे आहेत. राज्यकर्ते म्हणून राजकीय पक्षांनी खरे तर या कारणांना भिडून त्यावर समाधानकारक उत्तरे शोधायला हवीत. मात्र तशी इच्छाशक्ती सर्वपक्षीय राज्यकर्त्यांकडून आजवर कधीच दाखविली गेलेली नाही. त्यापेक्षा या समाजघटकांना आरक्षणाचे गाजर दाखवून आपली राजकीय पोळी भाजून घेण्याचा व आपापल्या मतपेढ्या मजबूत करण्याचा सोपा मार्ग आजवरच्या सर्वच राज्यकर्त्यांनी स्वीकारला. त्यातूनच आरक्षणाच्या घोषणांची स्पर्धाच राजकीय पक्षांमध्ये लागली व आपल्या उद्धाराचा एकमेव मार्ग म्हणजे आरक्षण, हीच भावना विविध समाजघटकांमध्ये घट्ट झाली. त्यातूनच आता ही आरक्षणकोंडी निर्माण झाली आहे व ती एवढी तीव्र बनली आहे की, समाजातील घटक आरक्षणासाठी एकमेकांसमोर संघर्षाचा पवित्रा घेऊन उभे ठाकले आहेत. आरक्षण मर्यादेमुळे घटनेतील नवव्या परिशिष्टाचा मुद्दाही आता ऐरणीवर आला आहे. बिहारमधील सध्याचा विरोधी पक्ष राजदने राज्याचा वाढीव आरक्षणाचा कायदा नवव्या परिशिष्टात समाविष्ट करण्यासाठी नितीशकुमार यांनी प्रयत्नच केले नसल्याचा आरोप केला आहे. त्यामुळे नितीश आपली मतपेढी सुरक्षित ठेवण्यासाठी केंद्र सरकारवर याबाबत दबाव टाकणार हे उघडच. त्याला केंद्रातले सरकार किती दिवस टोलविणार हे पाहण्यासारखे असेल.

## स्वाराती रुग्णालयात कार्यरत डॉक्टरांच्या खाजगी प्रॅक्टिस बंद करा -अभिजीत लोमटे

अंबाजोगाई । प्रतिनिधी

**स्वाराती रुग्णालयात कार्यरत डॉक्टरांचे खाजगी प्रॅक्टिस बंद करण्यात यावी अन्यथा आमरण उपोषणास बसण्याचा इशारा अंबाजोगाई डिजिटल मीडिया परिषदेचे अध्यक्ष अभिजीत लोमटे यांनी ईमेलद्वारे महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री, आरोग्यमंत्री यांना दिला आहे.**



स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालय हे गोरगरिबांना जीवन संजीवनी म्हणून लाभलेले वरदान आहे मात्र मागील काही वर्षापासून स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयात शासकीय सवेत असणारे डॉक्टरानी त्यांच्या पत्नी नातेवाईकांच्या नावावर आलिशान खाजगी दवाखाने चालू करत त्या दवाखान्यात स्वतः रुग्णास उपचार देतात. त्यामुळे स्वाराती रुग्णालयात येणाऱ्या रुग्णास योग्य व वेळेत उपचार मिळत नाही येथे कार्यरत डॉक्टर रुग्णास त्यांच्या खाजगी रुग्णालयात उपचारासाठी येण्यास सांगतात या खाजगी रुग्णालयात त्यांची आर्थिक पिळवणूक केल्याचे निदर्शनास आले आहे विशेषतः स्वारातीत फक्त हजेरी लावून खाजगी रुग्णालयात प्रॅक्टिस करण्यात ते जास्त व्यस्त आहेत. याशिवाय स्वा रा ती रुग्णालयातील अनेक जनाचे बाहेरगावी खाजगी रुग्णालय असल्यामुळे ते फक्त पगारी पुरतेच येतात अश्या डॉक्टर वर निलंबनाची कारवाई करण्यात यावी खाजगी रुग्णालय चालवणाऱ्या डॉक्टर वर कारवाई झाली नाही तर लोकशाही मार्गाने आमरण उपोषणास बसण्याचा इशारा महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री, आरोग्यमंत्री यांना ईमेल निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

## मराठा आरक्षण आंदोलन भरकवटण्याचा डाव-जरांगे पाटील

जालना । प्रतिनिधी

मराठा आंदोलन भरकटवण्याचा डाव सुरु आहे. त्यांना दंगली घडवून आणायच्या आहेत, असा आरोप करत आपल्या भविष्यासाठी तयार राहा. मागे हटू नका, तुम्ही तुमची एकजुट दाखवा. येत्या सहा जुलैला होणाऱ्या मराठा जनजागृती रॅलीत सहभागी व्हा, असे आवाहन मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे-पाटील यांनी सोमवार (दि.२४) माध्यमांशी बोलताना केले.

अजित पवार गटाचे नेते छगन भुजबळ यांनी माध्यमांशी बोलत असताना जरांगे-पाटील जातीयवाद निर्माण करत आहोत, असा आरोप केला होता. मनोज जरांगे-पाटील यांनीही याला सडेतोड उत्तर दिले होते. छत्रपती संभाजीनगरमधून माध्यमांशी बोलताना मनोज जरांगे-पाटील म्हणाले की, येत्या सहा जुलै रोजी होणााऱ्या मराठा जनजागृती रॅलीमध्ये सहभागी व्हा. आता आपण जशास तसे उत्तर द्यायचे. आपली जात संकटात सापडली आहे. आपल्या भविष्यासाठी तयार राहा. आता आबोसीतून आरक्षण मिळाल्याशिवाय मागे हटणार नाही, असा पुन्नरुच्चार त्यांनी केला. जाती-जातीमध्ये तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे; पण तुम्ही मागे हटू नका. तुम्ही तुमची एकजुट दाखवा. आपल्या भविष्यासाठी एक व्हा. मराठा कडवट आहे भित्रा नाही. मराठ्यांनी मराठ्यांवरच आरोप करणे बंद करा असे म्हणत मी आरक्षणाच्याच बाजुने उभा राहणार आहे. मी मेलो तरी मराठ्यांना आरक्षण मिळवून देणार असल्याचा निर्धारही त्यांनी व्यक्त केला.



नवी दिल्ली: बीड लोकसभा मतदारसंघातून विजयी झाल्यानंतर खासदार म्हणून बजरंग सोनवणे यांनी लोकशाहीच्या सर्वोच्च लोक मंदिरामध्ये पहिल्यांदा प्रवेश केला. यावेळी त्यांच्यासोबत खा. सुप्रिया सुळे यांच्यासह काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे सर्व खासदार.

## मानव जिवनात जन्म-मृत्यू विधीलिखीत; दुःख बाजूला ठेवून जिवन जगणे हेच मानवहित-नंदकिशोर शिवाचार्य

दिंद्रुड प्रतिनिधी

**मानवी जिवनात जन्म-मृत्यू हा विधी लिखीत आहे. त्यात कसलाही बदल होत नाही त्यामुळे प्रत्येकानी हि बाब अंगिकारली पाहिजे. प्रत्येक व्यक्तीच्या वाट्याला आलेले सुख-दुःख जिवनाचा अविभाज्य भाग आहे. तो आत्मसात करताना अनंत अडचणींवर मात करून जीवन जगताना व्यक्तीला समाधानी रहावं लागतं. दुःख बाजूला ठेवून जिवन जगणे हेच मानवहित असल्याचे मत सोनपेठ येथील नंदकिशोर शिवाचार्य महाराज यांनी बोलताना व्यक्त केले.**



दिंद्रुड येथील स्वराज राजेश स्वामी या दहा वर्षीय बालकाचा २० जुन रोजी विजेचा धक्का बसून दुर्दैवी मृत्यू झाला होता. या घटनेने स्वामी कुटुंबीयांसह दिंद्रुड येथील ग्रामस्थ शोकाकुल झाले आहेत. स्वामी कुटुंबीयांचे सांत्वन करण्यासाठी शुक्रवारी सायंकाळी सोनपेठ येथील नंदकिशोर शिवाचार्य महाराज उपस्थित होते. यावेळी दिंद्रुड येथील बहुतांश विरशैव समाज उपस्थित होता. दिंद्रुडसह परिसरात पत्रकार संतोष स्वामी व राजेश स्वामी हे सामाजिक कार्यामुळे सुपरिचित आहेत. स्वराजच्या अकाली निधनाने दोन्ही भावंडांचे सांत्वन करण्यासाठी दिंद्रुड पंचक्रोशीतील मित्र परिवार शेकडोंच्या संख्येने दिंद्रुड येथे दाखल होत आहेत. सोनपेठ चे नंदकिशोर शिवाचार्य महाराज, आयुष्यमान भारत चे प्रमुख डॉ.ओमप्रकाश शेटे, माजलगाव चे भाजपा नेते मोहन जगताप, ओबीसी नेते माधव निर्मळ, युवानेते भागवत दराडे, दिंद्रुड पोलीस ठाणे प्रमुख अण्णाराव खोडेवाड, माजलगाव पत्रकार संघाचे सर्व पत्रकार, दिंद्रुड परिसरातील सरपंच, राजकीय व सामाजिक कार्यकर्ते आदींनी स्वामी कुटुंबीयांचे सांत्वन करत धिर दिला.

## बहुजन महापुरुषांच्या विचारांचा अनुयायी म्हणून कायम रस्त्यावरची लढाई लढणार-अमोल शेरकर

माजलगाव । प्रतिनिधी

**महाराष्ट्र हा बहुजन महापुरुषांच्या नावाने जसा ओळखला जातो, त्याचप्रमाणे माझी ओळख त्यांचा अनुयायी म्हणून राहावी यासाठी बहुजनांच्या हितांचे प्रश्न घेऊन रस्त्यावरील लढाई लढणार असल्याचे मत अमोल शेरकर यांनी व्यक्त केले आहे.**

माजलगाव येथील वेंकटेश हॉटेल येथे आज दुपारी बीड जिल्ह्यातील प्रमुख कार्यकर्त्यांची बैठकीचे आयोजन करण्यात आले होते . या बैठकी वेळी मार्गदर्शन करताना अमोल शेरकर यांनी मत मांडले, पुढे बोलताना म्हणाले की



मी डीपीआय आहे पक्षाचा जिल्हा प्रमुख या नात्याने अनेक कार्यकर्त्यांशी संवाद व काम करण्याचा योग मागील दहा वर्षात आला आहे मात्र पक्षश्रेष्ठीना कार्यकर्त्यांची जाणीव नसल्याने मी राजीनामा दिला आहे, मात्र कार्यकर्ता म्हणून बहुजन समाजाच्या प्रश्नांबाबत अतिशय जागृतपणाने त्यांच्या प्रश्नांची उकल करण्यासाठी शासन दरबारी लढा उभारून प्रश्न सोडवण्याचा काम कायम रस्त्यावरील लढाई उतरून करणार आहे त्यासाठी आपण मला बळ देऊ सहकार्य करण्याची अपेक्षा त्यांनी केली या कार्यक्रमास उपस्थित अमोल वाघमारे , हनुमान तूपसौंदर , अनिल राधे कांबळे , विक्रम वाघमारे ,मिलिंद मुजमुले , केतन मिसाळ , कैलास क्षीरसागर ,अशोक थोरात , अशोक पाटोळे ,अभिषेक हातागळे जिल्हाभरातून आलेले प्रमुख कार्यकर्ते होते. हा कार्यक्रम आयुष्याची करण्यासाठी शंकर अलाट , दिपक शेरकर , राहुल हिवाळे, बाळू अवचार ,अक्षय थोरात , बाबुराव खंडागळे ,विष्णू शेरकर ,खंडू शेरकर , विष्णू कांबळे , सूरज अलाट , विशाल कांबळे , विजय शेरकर , जगदीश थोरात ,बबलू शेरकर , यांच्यासह अनेकांनी मदत केली आहे.

## चंद्रकांतदादांच्या काळातच पुण्यात हफ्ते वसुली, पब्ज संस्कृतीला उधाण; मिटकरींचे गंभीर आरोप

अकोला । प्रतिनिधी

**चंद्रकांत पाटील यांनी अजित पवार यांच्यावर केलेल्या टिकेवर आमदार अमोल मिटकरी यांनी तिखट शब्दांत प्रतिक्रिया दिली. पुण्यातील घटनेवरुन चंद्रकांत पाटलांवर आमदार अमोल मिटकरींनी गंभीर आरोप केले आहेत. चंद्रकांतदादांच्या पालकमंत्री पदाच्या कार्यकाळात पुण्यात अंमली पदार्थ, डान्स बार, पब्स, हप्ता वसुलीला उधाण आले होतें, असा गंभीर आरोप मिटकरी यांनी केला आहे. पालकमंत्री असताना पुण्यातील अवैध धंद्यांना चंद्रकांत पाटील छुप्या पद्धतीने समर्थन करत असल्याचेही मिटकरी यांनी म्हटले आहे. तसेच, अजितदादांनी या सर्व गोष्टींना समर्थन न केल्यामुळे हे प्रकार उघड होत असल्याचेही मिटकरी यांनी म्हटले आहे.**

पुण्यातील ड्रग्जप्रकरणावरुन राजकीय वातावरण चांगलच तापले असून पोलिसांसह उत्पादन शुल्क विभागानेही कारवाई सुरू केली आहे. पुण्याच्या एफसी रोडवरील एका बारमधील तरुणांचा ड्रग्ज घेतानाचा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर शिवसेना नेत्या सुषमा अंधारे यांनी आक्रमक पवित्रा घेत उत्पादन शुल्कमंत्री शंभूराज देसाईंना लक्ष्य केले. त्यानंतर, आमदार रविंद्र धंगेकरांनीही पुणे पोलिसांवर पुन्हा एकदा हफ्ताखोरीचे गंभीर आरोप केले आहेत. त्यामुळे, पुणे शहरातील गुन्हेगारी आणि वाढती पब संस्कृती, अंमली पदार्थांचा वापर आणि बदललेला नवा पॅटर्न सध्या चर्चेचा विषय बनला आहे. यावरुन, विरोधकांकडून सरकारला धारेवर धरले जात आहे. मात्र, आता राजकीय नेत्यांनी एकमेकांकडे बोट दाखवल्याचे दिसून येत आहे. पुण्याचे माजी पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी माझ्या काळात असे घडले नाही, असे म्हणत सध्याचे पालकमंत्री अजित पवार यांच्याकडे बोट दाखवले होते. त्यावरुन, आता राष्ट्रवादीच्या नेत्यांनी चंद्रकांत पाटील यांच्यावर हल्लाबोल केला आहे. आधी भुजबळ आणि आता अमोल मिटकरी यांनी चंद्रकांत पाटील यांच्यावर टीका केली आहे. अमोल मिटकरींच्या या आरोपानंतर आता महायुतीत आणखी तणाव निर्माण होण्याची शक्यता आहे. कारण, आधीच लोकसभा निवडणुकीनंतर महायुतीत अजित पवार गट वेगळा पडल्याचे चित्र आहे, त्यातच आगामी विधानसभा निवडणुकांना महायुतीमध्ये अजित पवार नको, असाही सूर काही नेत्यांकडून उमटला आहे. त्यामुळे, महायुतीत बिघाडी होण्याची चिन्हे दिसत आहेत. कारण, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाने आमदार आणि प्रवक्ते अमोल मिटकरींनी थेट चंद्रकांत पाटील यांच्यावर घणाघाती आरोप केले आहेत. दरम्यान, दोनच दिवसांपूर्वी अमोल मिटकरी यांनी राष्ट्रवादी काँग्रेसने वंचित बहुजन आघाडीसोबत एकत्र आल्यास राज्यात वेगळे चित्र पाहायला मिळेल, असे म्हटले होते. त्यानंतर, त्यांनी व्हिडिओच्या माध्यमातून सारवासारवही केली होती.

## उष्माघाताचा कहर : हज यात्रेतील मृतांची संख्या १,३०१ वर

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

सौदी अरेबियात उष्माघाताने मृत्युमुखी पडलेल्या हज यात्रेकरूंची संख्या . १,३०१ झाली आहे. मृतांपैकी ८३ टक्के हे अनधिकृत यात्रेकरू होते. ते कडक उन्हात मक्का या पवित्र शहरात आणि आजूबाजूला हजचे विधी पार पाडण्यासाठी लांबचे अंतर चालले होते, अशी माहिती सौदीचे आरोग्य मंत्री फहद बिन अब्दुररहमान अल-जलाजेल यांनी दिली. दरम्यान, यामध्ये ९८ भारतीय यात्रेकरूंचा मृत्यू झाला आहे. मृतांमध्ये सर्वाधिक संख्या इजिप्शियन यात्रेकरूंची आहे. परराष्ट्र मंत्रालयाने या सर्व लोकांच्या मृत्यूचे कारण आजारपण आणि वृद्धत्व असल्याचे सांगितले आहे. ६६० हून अधिक इजिप्शियन हज यात्रेकरूंचा मृत्यू झाला आहे. कैरोमधील अधिकाऱ्यांनी सांगितले की, ३१ यात्रेकरु वगळता अन्य विनानोंदणीच मक्केमध्ये आले होते. नोंदणीअभावी या यात्रेकरूंना हजची सुविधा मिळत नाही.

## पान १वरून...

### राज्यात दुध दरावरून

जाते, त्यावर समान दराने जीएसटी भरावा लागेल. त्यामुळे दूध व्यवसायाला फटका बसणार आहे. यावरून सुळे यांनी, जीएसटी कौन्सिलमध्ये महाराष्ट्राच्या वतीने कोण गेले होतं? महाराष्ट्राच्या प्रतिनिधींनी याचा विरोध का केला नाही? असा सवाल केला. तर संसदेत पहिला शेतकरी प्रश्न, नीटची परीक्षा आणि आरक्षणाचा विषय यावरच सविस्तर चर्चा करणार असल्याची माहिती सुळे यांनी दिली. दरम्यान, महाराष्ट्रातील भाजपा प्रणित सरकार हे शेतकरी विरोधी असल्याचे पुन्हा एकदा उघड झाले आहे. विविध राज्यात शेतकऱ्याच्या दुधाला ४५ रुपया पर्यंत भाव मिळत आहे परंतु महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या दुधाला फक्त २७ रुपये भाव मिळतो आणि हेच दूध अमूल व इतर दूध कंपन्यांकडून ग्राहकाला ५५ ते ६० रुपये प्रति लिटर विकले जात आहे. राज्य सरकारने तातडीने यात लक्ष घालून दूध उत्पादक शेतकऱ्यांना दूधाचे दर वाढवून द्यावेत, अन्यथा शेतकऱ्यांना न्याय देण्यासाठी रस्त्यावर उतरावे लागेल, असा इशारा काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी दिला आहे. गांधी भवन येथे प्रसार माध्यमांशी बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले की, श्वेतक्रांतीमध्ये ज्या दुध उत्पादक शेतकऱ्यांचे मोठे योगदान आहे त्यांनाच राज्यातील भाजपा-शिंदे सरकार लुटत आहे. गाई, म्हशींचे खाद्य व त्यांच्यावर होणाऱ्या खर्चात प्रचंड वाढ झाली आहे, त्याप्रमाणात दूध खरेदी दर मात्र कमी आहेत. हे दर वाढवून देऊन शेतकऱ्यांची होणारी लूट थांबवावी अशी मागणी त्यांनी केली. पुढे बोलताना नाना पटोले म्हणाले की, काँग्रेस पक्षाने शेतकऱ्यांना दिलेल्या आश्वासनाची पूर्तता करत तेलंगणातील काँग्रेस सरकारने शेतकऱ्यांचे सरसकट २ लाख रुपयांचे कर्ज माफ केले आहे. २७ जूनपासून राज्य विधिमंडळाचे अधिवेशन सुरु होत असून भाजपा शिंदे सरकारनेही शेतकऱ्यांचे कर्ज माफ करण्याची घोषणा या अधिवेशनात करावी, अशी मागणी केली. शरद पवारांची राष्ट्रवादी आणि काँग्रेस येत्या काळात दूध दरावरून मोठे आंदोलन उभारण्याच्या तयारीत असल्याचे दिसत आहे.

-----

### केंद्राकडून भगवानगडाच्या विकासासाठी

देण्यात यावी, याबाबत धनंजय मुंडे यांच्या माध्यमातून राज्य शासनास व केंद्र शासनास विनंती केली होती.भगवानगडाच्या परिसरातील या जमिनीवर रुग्णालय, सामाजिक प्रशिक्षण केंद्र, यात्री निवास, वाहन तळ इत्यादी कामे आगामी काळात करणे प्रस्तावित आहे. कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी याबाबत सातत्याने पाठपुरावा केला असून, त्यांच्या मागणीला यश आले आहे. धनंजय मुंडे यांनी भगवानगड भक्त परिवाराच्या वतीने केंद्रीय वन विभागाचे व राज्याचे वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांचे आभार मानले आहेत.

-----------

### पंकजा मुंडेंबाबत आक्षेपार्ह

भाजप नेत्या पंकजा मुंडे यांच्याविषयी इन्स्टाग्रामवर आक्षेपार्ह पोस्ट टाकणाऱ्या युवकावर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी आरोपीविरुद्ध परळीत गुन्हा दाखल झाला होता. पोलिसांनी तपास सुरू केला असता सदरील युवकाला परभणी पोलिसांनी ताब्यात घेतले. आता, संबंधित युवकाला परळी पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले आहे. सदरील आरोपीने इन्स्टाग्रामवर पंकजा मुंडे यांच्याविषयी अत्यंत अश्लील शब्दांत एक प्रतिक्रिया टाकली होती. आपल्या पोस्टमुळे भावना दुखावल्या जाणे तसेच दोन जातीमध्ये किंवा दोन गटात द्वोषाची भावना निर्माण होईल, याची कल्पना असताना देखील जाणीवपूर्वक इंस्ट्राग्रामवर ही पोस्ट टाकण्यात आली. त्यामुळे, याप्रकरणी आरोपीविरुद्ध ग गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बीड जिल्ह्यातील परळी हा भाजपचा बालेकिल्ला मानला जातो. या मतदारसंघात धनजंय मुंडे आणि पंकजा मुंडे बहीण भाऊ एकत्र आल्यानंतर महायुतीची ताकद वाढली होती. त्यामुळे यंदाच्या निवडणुकीत पंकजा मुंडेंचा विजय पक्का असल्याचे बोलले जात होते. मात्र, जातीय रंग लागल्याने यंदाच्या निवडणुकीत बीड आणि गेवराई या दोन मतदारसंघात बजरंग सोनवणे यांनी चांगलीच आघाडी घेतली. या दोन मतदारसंघात पंकजा मुंडेंना मोठा फटका बसला. अत्यंत चुरशीच्या झालेल्या लढतीत निकाल जाहीर झाल्यानंतर मात्र पंकजा मुंडे यांचा पराभव झाल्याचा निकाल जाहीर झाला. निकाल स्पष्ट झाल्यानंतर पंकजा मुंडे यांच्या संदर्भात एका तरुणानं आक्षेपार्ह पोस्ट केली होती. आरोपीनं काही कार्यकर्ते नाचत असलेला एक व्हिडीओ सोशल मीडियावर पोस्ट केला, तसेच व्हिडीओखाली आक्षेपार्ह पोस्टही लिहिली होती.

---------------------------- ----

### जातीपातीचे विष

अशी भीती व्यक्त केली आहे. जातीपातीचे विष कालवणाऱ्यांना दुर ठेवा असा सल्ला महाराष्ट्रातील जनतेला ठाकरे यांनी यावेळी दिला. मनसेच्या पदाधिकाऱ्यांची बैठक सोमवारी मुंबईत पार पडली. या बैठकीनंतर पत्रकारांशी बोलातना राज ठाकरेंना बैठकीबद्दल विचारण्यात आले. त्यावर उत्तर देताना त्यांनी, पक्षांतर्गत बैठक होती. निवडणुकाच्या दृष्टीकोनातूनच आजची आमची पक्षाची अंतर्गत बैठक होती. त्यांना काही कार्यक्रम उपक्रम दिले आहेत. त्यानुसार ते मला येतील आणि भेटतील आणि माझ्याशी बोलतील, असे सांगितले. यानंतर राज ठाकरेंना राज्यातील सध्य परिस्थितीवरुन प्रश्न विचारण्यात आला. राज्यात ज्यापद्धतीने राजकीय तेढ वाढतोय त्याकडे कसं पाहात? राज्यकर्त्यांकडून एका समाजाला आश्वासन दिल्यानंतर दुसरा समाज नाराज होत आहे, असे म्हणत प्रश्न विचारण्यात आला. या प्रश्नावर राज ठाकरेंनी, मला वाटते या सर्व सामाजांना ही गोष्ट समजणे गरजेचे आहे की या जातीपातीमधून काही होणार नाही. मी इतकी वर्ष माझ्या भाषणांमध्ये, मुलाखतींमध्ये हे बोललो आहे. हे सर्व पुढारी जातीपातींमध्ये द्वोष पसरवून फक्त मतं हातात घेतात. भोलचटपणे हे मतं देतील देखील, असे राज ठाकरे म्हणाले.

--------------

### कॅनडाच्या संसदेत दहशतवादी निज्जरला

वाहिली. यासोबतच त्यांनी दहशतवाद खपवून घेतला जाणार नाही, असा सज्जड दमही कॅनडाला दिला. खलिस्तानी दहशतवादी हरदीपिंसग निज्जरच्या हत्येनंतर भारत आणि कॅनडाचे संबंध बिघडले आहेत. अशातच मंगळवारी निज्जरच्या हत्येला एक वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त कॅनडाच्या संसदेत मौन पाळण्यात आले होते.

---------

### संसद अधिवेशनाला सुरुवात,

बसले होते. संसदेच्या लोकसभेच्या प्रोटेम अध्यक्षपदी बीजेडीमधून भाजपामध्ये प्रवेश केलेले भर्तृहरी महताब यांची निवड करण्यात आली. भर्तृहारी महताब हे सलग सहा वेळा ओरिसातून निवडूण आलेले आहेत. मात्र लोकसभा निवडणूकीच्या आधी भर्तृहरी महताब बीजेडीतून भाजपामध्ये प्रवेश करत भाजपाच्या चिन्हावर निवडणूक लढविली आणि ते विजयीही झाले. भर्तृहारी महताब यांनीच पंतप्रधान नरेंद्र मोदी, राजनाथ सिंग, अमित शाह, पियुष गोयल यांच्यासह अनेकांना खासदारकीची शपथ दिली.

**पहिल्याच दिवशी विरोधकांनी दाखविली ताकद**

संसद अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी विरोधकांनी आपली मोठी ताकद दाखवित एनडीए सरकारला हवे तसे निर्णय आणि कामकाज राबविता येणार नाही असा इशाराच दिला. तसेच यावेळी नॅशनल कॉन्फरन्सचे नेते फारूख अब्दुल्ला यांनी लोकसभेत बोलताना म्हटले की, सर्व विजयी खासदारांचे अभिनंदन करतो. मला आशा आहे की, संसदीय लोकशाही टीकेल. देशातील सरकार कुबड्यांवर असून त्यांच्यासमोर सशक्त विरोधी पक्ष उभा आहे.

**काय म्हणाले पंतप्रधान मोदी?**

अधिवेशनापूर्वी केलेल्या भाषणात पंतप्रधान मोदी म्हणाले की, भारताला जबाबदार विरोधी पक्षाची गरज आहे. लोकांना विरोधकांकडून चांगल्या गोष्टींची अपेक्षा आहे, परंतु आतापर्यंत त्यांनी निराशाजनक कामगिरी केली आहे. विरोधक आपली भूमिका बजावतील आणि लोकशाहीची प्रतिष्ठा राखतील, अशी आशा आहे. यावेळी त्यांनी २५ जून रोजी आणीबाणीला ५० वर्षे पूर्ण होत असल्याची आठवणही त्यांनी करून दिली आणि याला भारताच्या लोकशाहीवरील काळा डाग म्हटले. तुमच्या पाठिंब्याबद्दल आणि विश्वासाबद्दल मी तुम्हा सर्वांचा ऋणी आहे. सरकार चालविण्यासाठी बहुमत आवश्यक आहे, पण देश चालवण्यासाठी एकमत आवश्यक आहे असे पंतप्रधानांनी म्हटले.

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार....
मंगळवार दि. २५ जून २०२४


## एन फिल्म आयोजित राष्ट्रीय उत्कृष्ट सामाजिक कार्यकर्ता पुरस्कार पत्रकार शेख आयेशा यांना जाहीर

**बीड । प्रतिनिधी**

राष्ट्रीय सिने गौरव पुरस्कार २०२४ नुकताच जाहीर करण्यात आला आहे. या पुरस्कारामध्ये बीड येथील सामाजिक कार्यकर्त्या तथा पत्रकार शेख आयेशा यांची राष्ट्रीय उत्कृष्ट पत्रकार तथा सामाजिक कार्यकर्त्या म्हणून निवड जाहीर करण्यात आली आहे. लवकरच हा पुरस्कार प्रसिद्ध सिने अभिनेते अभिनेत्री, कलावंत, लोकप्रतिनिधी, प्रशासकीय अधिकारी यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये छत्रपती संभाजीनगर येथे प्रदान करण्यात येणार आहे. एन फिल्म प्रोडक्शन आयोजित राष्ट्रीय सिनेगौरव पुरस्कार २०२४ नुकताच जाहीर करण्यात आला आहे. या पुरस्कारामध्ये कलावंतांसह सामाजिक कार्यात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या सन्माननीय व्यक्तींचा राष्ट्रीय उत्कृष्ट सेवा गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. महाराष्ट्रात किन्नर कम्युनिटीवर पत्रकार शेख आयेशा यांच्या कामाची दखल घेऊन एन फिल्म त्यांना राष्ट्रीय उत्कृष्ट कार्यकर्त्या आणि पत्रकार २०२४ या पुरस्काराचे मानकरी म्हणून निर्माता दिग्दर्शक दीपक म्हस्के आणि निर्माता दिग्दर्शक लेखक हिरामण मनोहर यांनी जाहीर केले आहे.

# शक्तीपीठ महामार्गास तीव्र विरोध

## महामार्ग रद्द अधिसूचना सरकारने काढावी; बाधित शेतकऱ्यांची मागणी

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

पवणार ते पत्रादेवी या शीघ्र द्रुतगती शक्तिपीठ मार्गास राज्यात शेतकऱ्यांना कडाडून विरोध होत असून राज्य सरकार हा प्रस्तावित महामार्गास स्थगिती दिल्याचे सांगत शेतकऱ्यांची दिशाभूल करत आहे.स्थगिती नकोय महामार्ग रद्द करण्यात आल्याची अधिसूचना काढण्यात यावी अन्यथा बाधित शेतकरी आपल्या कुटूंबासह हे आंदोलन अधिक तीव्र करतील असा इशारा परळी-अंबाजोगाई येथील बाधित शेतकऱ्यानी सरकारला दिला आहे.

नागपूरपासून गोव्यादरम्यान महाराष्ट्रातील धार्मिक स्थळे जोडण्यासाठी, तसेच पर्यटनाला चालना देण्यासाठी मागणी नसताना देखील समृद्धी महामार्गाच्या धर्तीवर आणखी लांब पल्ल्याचा शक्तीपीठ द्रुतगती मार्ग उभारण्याचा निर्णय फेब्रुवारी २०२४ मध्ये घेण्यात आला होता.राज्यातील १२ जिल्ह्यातून जाणाऱ्या या महामार्गाच्या उभारणीस तब्बल ८६ हजार कोटी खर्च येणार असून या महामार्गासाठी २७ हजार एक्कर पेक्षा अधिक शेतजमीन शासन संपादित करणार आहे.नागपूर-रत्नागिरी महामार्ग अस्तित्वात असताना देखील हजारो कोटी रुपयांचे कर्ज घेऊन शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित करून शेतकऱ्यांना भूमिहीन करण्याचे काम सरकार कडून होत असल्याचे लक्ष्यात येताच राज्यात या महामार्गास तीव्र विरोध होत आहे.

मराठवाड्यातील नांदेड, हिंगोली, परभणी, बीड, लातूर, धाराशिव जिल्ह्यातून शक्तीपीठ महामार्ग हा प्रस्तावित असून हा मार्ग अत्यन्त सुपीक आणि बागायती जमिनीतून जाणार आहे. त्यामुळे मराठवड्यातील खूप मोठी बागायत जमीन



या महामार्गामध्ये जाऊन शेतकरी कायमचे भूमिहीन होणार आहेत. या शक्तिपीठ महामार्गास शेतकरी विरोध करण्याच्या अनुषंगाने १३ एप्रिल २०२४ रोजी परळी येथे मराठवाड्यातील बाधित शेतकऱ्यांची विभागीय बैठक संपन्न झाली.याबाबत शेतकऱ्यांनी मराठवाडाभर संवाद यात्रा देखील काढली तर अनेक ठिकाणी तीव्र आंदोलन देखील झाली.

सरकार कडून हा महामार्ग होणार नाही असे सांगण्यात येत आहे तर दुसऱ्या बाजूला जमीन संपादित करण्यासाठी आर्थिक तरतूद देखील करण्यात आलेली आहे ही बाब शेतकऱ्यांच्या लक्ष्यात आलेली असल्याने हे आंदोलन अधिक तीव्र बनले.शुक्रवार दि २१ रोजी बीड जिल्ह्यातील परळी-अंबाजोगाई येथील शेकडो बाधित शेतकऱ्यांची बैठक वरवटी व धायगुडा पिंपळा या ठिकाणी संपन्न झाली.या बैठकीत सरकारला शेतकऱ्यांच्या विरोधात जाऊन महामार्ग बनवायचा असेल तर भविष्यात तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा सरकारला देण्यात आला.या प्रसंगी अखिल भारतीय किसान सभेचे जिल्हाध्यक्ष एड.अजय बुरांडे यांच्यासह माजी न्यायाधीश बी.आर तिडके, अँड.एल.एन.शिंदे, वरवटी गावचे सरपंच सुधीर चाटे सह मोठ्या संख्येने शेतकरी आणि गावकरी उपस्थित होते.

> शक्तिपीठ श्रद्धेचा भावनिक मुद्दा धरून मागणी नसताना देखील हजारो कोटी रुपयांचे कर्ज घेऊन हजारो एक्कर सुपीक, बागायती जमीन संपादित करून शेतकऱ्यांना कायम स्वरूपी भूमिहीन करत भिकेला लावणारा हा शक्तीपिठ महामार्ग नसून कंत्राटदार हित महामार्ग आहे.विधान सभा निवडणुकीच्या तोंडावर केवळ शेतकऱ्यांची दिशाभूल करण्यासाठी स्थगिती दिल्याची घोषणा सत्ताधारी करत आहेत.यापूर्वी देखील अतिरीक्त ऊस अनुदान, सोयाबीन, कापूस भावांतर याबद्दल देखील सत्ताधा-यांनी घोषणा केली मात्र शून्य अंमलबजावणी झाली.
> – एड.अजय बुरांडे, राज्य उपाध्यक्ष, अखिल भारतीय किसानसभा

## राजकिशोर मोदी यांनी मास्टर कलश नितीन मंत्री याला नीट व सीईटी परीक्षेतील उत्तुंग यशाबद्दल केले सन्मानित

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

अंबाजोगाई येथील न्यू व्हिजन पब्लिक स्कुलचा माजी विद्यार्थी मास्टर कलश नितीन मंत्री याला नुकत्याच झालेल्या व परीक्षेत मिळालेल्या उत्तुंग यशाबद्दल त्याचा सन्मान संस्थेचे संस्थापक सचिव राजकिशोर मोदी यांनी इतर मान्यवरांच्या उपस्थितीत सन्मान व सत्कार करण्यात आला. याप्रसंगी संस्थेचे जेष्ठ मार्गदर्शक प्रा वसंत चव्हाण, प्रा. डॉ. डी एच थोरात, ऍड विष्णुपंत सोळंकी, संस्थेचे कार्यकारी संचालक संकेत मोदी, प्राचार्य रेंजो आर चंद्रन त्याच बरोबर कलशचे आई वडील हेही सन्मानपर कार्यक्रमास उपस्थित होते.

कलश मंत्री याने परीक्षेत ७२० पैकी ६४७ , परीक्षेत ९९.९ तर मेन्स मध्ये ९५.२५ एवढे गुण मिळवले आहेत. त्याचबरोबर इयत्ता बारावीच्या परीक्षेत त्याने ८९.१७% इतके गुण अर्जित केले आहेत. कलश याचे इयत्ता पहिली ते दहावी पर्यंतचे शिक्षण हे श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे न्यू व्हिजन पब्लिक स्कुल येथे झाले आहे. मास्टर कलश याने मिळवलेल्या या यशाच्या बळावर तो ८०,००० रुपयांच्या



स्किलरशिप साठी देखील पात्र ठरला आहे. त्याने मिळवलेल्या या उत्तुंग यशाबद्दल मास्टर कलश मंत्री याचा सत्कार व सन्मान नुकताच राजकिशोर मोदींच्या हस्ते न्यू व्हिजन पब्लिक स्कुलच्या प्रांगणात करण्यात आला आहे.

याप्रसंगी कलश यास शुभेच्छा देताना राजकिशोर मोदी यांनी त्याचे तोंड भरून कौतुक व अभिनंदन केले तसेच त्याचा सन्मान व सत्कार करत त्याला पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. मास्टर कलश याच्या मुळे संस्थेच्या शिरपेचात एक मानाचा तुरा खोवला गेला असल्याची भावना याप्रसंगी राजकिशोर मोदी यांनी व्यक्त केली. मास्टर कलश हा विद्यार्थी सुरुवाती पासूनच अतिशय अभ्यासू वृत्तीचा होता. त्याला त्याच्या जिद्द व चिकाटीस वेळोवेळी शालेय शिक्षकांनी देखील समर्थन देत योग्य असे मार्गदर्शन केले. त्याचबरोबर कलशच्या आई वडीलानी देखील त्याला खंबीर अशी साथ देत त्याला पाठबळ दिले. या सर्वांच्या व स्वतः कलश याच्या मेहनतीमुळे आज कलश हे उंच शिखर गाठू शकला असल्याचे मोदी यांनी सांगितले. यावेळी कलश याला प्रा वसंत चव्हाण, प्रा. डी. एच थोरात , यांनी देखील आपल्या शुभेच्छापर मनोगताद्वारे अभिनंदन केले.या कार्यक्रमाचे संचलन विजय रापतवार यांनी केले तर आभार शरद शिंदे यांनी व्यक्त केले.

## कासेवाडी येथील निकृष्ट दर्जाच्या सिमेंट नाला बंधाऱ्याची चौकशी करा;भाऊसाहेब पवार यांच्यासह ग्रामस्थांची मागणी



आष्टी : आष्टी तालुक्यातील कासेवाडी येथील मृद व जलसंधारण विभागाअंतर्गत केलेल्या सिमेंट नाला बंधारा क्रमांक १/२/३/४ हे काम अतिशय निकृष्ट दर्जाचे झाल्याने या कामाची संबंधित ठेकेदाराने टाकडुजी करून काम पूर्ण झाल्याचे आव आणत बिले सादर केली असून ती मंजूर करू नये अशी तक्रार भाऊसाहेब पवार यांच्यासह ग्रामस्थांनी बीड उपविभागीय जलसंधारण अधिकारी मृद व जलसंधारण उपविभाग यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. या निवेदनाद्वारे असे म्हंटले आहे की, आाष्टी आष्टी तालुक्यातील ब्रह्मगाव ग्रामपंचायत अंतर्गत कासेवाडी सिमेंट नाला बंधारा क्रमांक १/२/३/४ या बंधाऱ्यांची कामे अतिशय निकृष्ट पध्दतीने झालेली आहेत.संबंधित कामे चालु असताना काम कन असलेल्या संस्थेला वारंवार तोंडी सुचना देऊन देखील सदर संस्थेने या कामाकडे कानाडोळा केला व निकृष्ट पध्दतीने कामे संपवण्यात आली.वरीक बोगसगिरी करून केलेल्या कामांचे देयके देऊ नयेत अन्यथा बीड येथे मृद व जलसंधारण विभाग यांच्या कार्यालयासमोर उपोषण करण्यात येईल असा इशारा भाऊसाहेब सोपान पवार व इतर ग्रामस्थ यांनी निवेदनाद्वारे दिला आहे.

## औष्णिक विद्युत निर्मिती केंद्र पुर्ण क्षमतेने नियमित कार्यान्वित करण्यासाठी प्रयत्न करणार -मुख्य अभियंता सुनील इंगळे

**परळी । प्रतिनिधी**

परळी औष्णिक विद्युत निर्मिती केंद्र पुर्ण क्षमतेने नियमित कार्यान्वित करण्यासाठी प्रयत्नशील राहू असे



प्रतिपादन औष्णिक विद्युत निर्मिती केंद्राचे नुतन मुख्य अभियंता सुनील इंगळे यांनी पदभार स्विकारताना केले.

येथील औष्णिक विद्युत निर्मिती केंद्रात गेल्या ११ महिन्यापासून डॉ अनिल काठोये यांनी अत्यंत शिस्तबद्ध पध्दतीने औष्णिक विद्युत निर्मिती केंद्राचा कारभार चालवला. १४ जूनला डॉ काठोये यांची बदली मुंबई येथे मुख्य कार्यालयात झाल्याने त्यांच्या जाग्यावर उरण येथे मुख्य अभियंतापदी कार्यरत असलेले मुख्य अभियंता सुनील इंगळे यांची येथे बदली करण्यात आली आहे. सोमवारी दि २४ रोजी नुतन मुख्य अभियंता सुनील इंगळे यांनी प्रभारी मुख्य अभियंता अमित बनकर यांच्याकडून औष्णिक विद्युत केंद्राचा पदभार स्विकारला. यावेळी औष्णिक विद्युत निर्मिती केंद्रातील अधिकारी, कर्मचाऱ्यांनी त्यांचे शाल, पुष्पहार देवून स्वागत केले. यावेळी बोलताना सुनील इंगळे म्हणाले की, येथील औष्णिक विद्युत निर्मिती केंद्र पूर्ण क्षमतेने नियमित सुरू ठेवण्यासाठी प्रयत्न करणार असून अधिकारी, कर्मचारी, कंत्राटदार, कामगार यांनी सहकार्य करावे. यावेळी प्रभारी मुख्य अभियंता अमित बनकर, प्रभारी उपमुख्य अभियंता हिमतराव अवचार, अधिक्षक अभियंता संभाजी बुक्तारे, एस,ए सनाके, वरिष्ठ व्यवस्थापक अरविंद येरणे, सहाय्यक कल्याण अधिकारी शरद राठोड, प्रशांत वंजारी, मदन पवार यांच्यासह इतर अधिकारी, अभियंता, कर्मचारी उपस्थित होते.

पान ६ वरून...

### चक्क सार्वजनिक बांधकाम

पाठिंबा देण्यासाठी आलेले शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई ॲड.नारायण गोले पाटील यांना अश्लील भाषा वापरत शिवीगाळ केली.यानंतर जिजामाता विद्यालयातील शिक्षकासह पिंपरी खुर्द,डिग्रस, खतगव्हाण आदी गावच्या विद्यार्थ्यांसह पालकांनी सार्वजनिक बांधकाम कार्यालयात तब्बल चार तास शाळा भरवली यावेळी जिजामाता विद्यालयाचे शिक्षक श्री परमेश्वर डाके यांनी कार्यालयातच विद्यार्थ्यांचा पाठ घेतला तर ग्रामस्थासह विद्यार्थ्यांनी कार्यालयासमोर भ्रष्ट व कामचुकार अभियंता नरहरे, मळेकर यांच्या विरोधात प्रचंड घोषणाबाजी केली.. यावेळी जिजामाता विद्यालयाचे मुख्याध्यापक बाबू गवळी,शिक्षक श्री परमेश्वर डाके यांच्यासह डिग्रसचे सरपंच सुभाष नाटकर,दादाराव पायघन,अजय बुरंगे,अर्जुन पायघन,योगेश पायघन,उद्धव पायघन,योगानंद पायघन,रणजीत पायघन,गणेश पांचाळ,भीमराव पायघन,आदींची उपस्थिती होती.

### परळी शहरातील बिंगो मटका

कारवाई सर्व बिंगो मटका चालकावर झाली पाहिजे ज्यामुळे लोकांचे घर उध्वस्त होणार नाही.बिंगो मटका हे मोबाईल मध्ये असल्यामुळे शाळकरी व महाविद्यालयीन विद्यार्थीही खेळत असल्याचे सांगितले जात आहे.या कडे पोलिसांनी गंभीर्याने लक्ष देऊन सर्व बिंगो मटका चालकावर कारवाई करण्यात यावी अन्यथा नाईलाजास्तव लोकशाही मार्गाने परळी पोलीस स्टेशन समोर उपोषण करण्यात येईल असा इशारा देण्यात आला आहे.

यावेळी मुफ्ती अश्फाक साहेब, नगरसेवक शरीफ भाई, गफ्फार बागवान,शहेरयार सय्यद,साजेद भाई,बद्दर भाई,अलीम भाई,अनवर शेख,एजाज शेख,अशफाक शेख,अझगर सय्यद,राजा खान,फेरोज जनाब,एजाज खान,जुबेर शेख व इतर नागरिक उपस्थित होते

### पत्रकार अविनाश कदम यांना

उद्योजिका तथा सामाजिक कार्यकर्त्या सगिताताई गुरूव, जिजाऊ ब्रिगेडच्या अहमदनगर जिल्हाध्यक्षा तथा जिजाऊ व्याख्यात्या अनिताताई काळे, देवानंद कांबळे, सेवा निवृत्त कर्नल जी पी लद्धा, पत्रकार संघाचे अध्यक्ष प्रकाश जाधव, सचिव सुरज भोईर आदी मान्यवर उपस्थित होते.

### बीडमध्ये एमबीबीएस

यांनी आज केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार आयूष ) प्रतापराव जाधव यांची भेट घेऊन आग्रही मागणी केली आहे,तसेच होमिओपॅथी वैद्यकीय शिक्षणामध्ये देखील अनेक अडचणी निर्माण होत असून या समस्या देखील सोडवण्यात याव्यात अशीही मागणी करण्यात आली या सर्व मागणीचा विचार करून केंद्रीय मंत्री जाधव यांनी लवकरात याबाबत निर्णय घेणार असून या मागणीला त्यांनी सकारात्मकता दर्शवली आहे.

### कागदोपत्री योजना करुन आर्थिक

त्यांच्यावर तात्काळ गुन्हा दाखल करावा आणि ग्रामसेवक यांना बडतर्फ करावे अन्यथा सोमवार दि.२४ जुन २०२४ रोजीपासुन आष्टी पंचायत समिती कार्यालयासमोर आमरण उपोषण करणार असल्याचे निवेदनात म्हटले आहे.या निवेदनावर गोकुळ नरवडे,सोमनाथ करडूळे,माणिक नरवडे आणि विजय डुकरे यांच्या सह्या आहेत.दरम्यान माहितीचा अधिकार कायदा २००५ नुसार ग्रामविकास अधिकारी यांना दि.१३ मार्च २०२४ रोजी माहिती मागीतली आहे. तीन महिने ऊलटले तरी अद्याप माहिती मिळालेली नाही.२०२२ ते २०२४ या कालावधीत झालेल्या कामांची माहिती मागीतली आहे. माहिती न देणाऱ्यावर कडक कारवाई करण्यात यावी अशीही मागणी होत आहे.

# एकेकाळी ग्रामीण भागातील महत्त्वाचा घटक असलेला गोबरगॅस आज कालबाह्य

**ज्योतीराम पांढरपोटे । माजलगाव**

ग्रामीण भागात पूर्वी शेतीसोबत पाळीव जनावरे मोठ्या प्रमाणात प्रत्येक शेतकऱ्याकडे असायची. दिवसेंदिवस ग्रामीण भागात शेतीसाठी ट्रॅक्टरसह आधुनिक यांत्रिक साधनांचा वापर मोठ्या प्रमाणात होत असल्यामुळे मोठ्या शेतकऱ्यांसह अल्प भूधारक शेतकऱ्यांना शेती उपयोगी जनावरे पाळणे कठीण झाले आहे.

पुर्वी शेतकऱ्यांकडे पडीक जमीन असायची.त्यामुळे जनावरांचा चाऱ्याचा प्रश्न शेतकऱ्याकडे नसायचा.पूर्वी ज्वारीची पिकेही शेतकरी मोठ्या प्रमाणात घेत असत.कालांतराने ज्वारीचे पीकही कमी झाले. परिणामी खेडोपाडी ग्रामीण भागाच्या प्रगतीसाठी एकेकाळी महत्त्वाचा घटक असणारा गोबरगॅस आज कालबाह्य झाला आहे. भारत हा कृषिप्रधान देश म्हणून जगात ओळखला जातो. कारण भारतात ७५ टक्के नागरिक शेती व्यवसाय करतात. पुर्वी घरोघरी बैलजोडी,गायी, म्हशी,शेळ्या,मेंढ्या अशी दुधाळ जनावरे मोठ्या प्रमाणात पाळली जात होती. शेतीसोबत दुग्ध व्यवसायासाठी या पाळीव प्राण्यांचा उपयोग होत असे. ज्यांच्याकडे पाळीव जनावरे होती त्या प्रत्येकाकडे हमखास अनुदानातून किंवा खाजगी खर्चातून गोबर गॅस संयंत्र बसविण्यात आली होती.या गोबर गॅसमुळे स्वयंपाकासाठी धूर विरहित गॅसमुळे प्रदूषण रोखण्यास मदत तसेच झटपट स्वयंपाक करता येत होता.त्यातून निघणाऱ्या शेनकुटापासुन नैसर्गिक सेंद्रिय शेती होत होती. मात्र आता दिवसेंदिवस शेतीच्या आधुनिकरणात शेतकऱ्यां जवळील पशुधन कमी झाल्याने ग्रामीण भागातील गोबरगॅस कालबाह्य झाल्याचे दिसून येत आहे.''

बायोगॅस तयार करण्यासाठी वापरला जाणारा प्रमुख स्त्रोत म्हणजे गायीचे शेण, भारतात गोबर म्हणून ओळखले जाते हे लक्षात घेऊन या शब्दाचा उगम भारतात झाला.गोबर गॅसची निर्मिती बायोगॅस प्लांटमध्ये शेणाच्या किंवा गोबरच्या ऍनारोबिक विघटनाद्वारे केली जाते.गोबर गॅस हा मोठ्या प्रमाणावर वापरल्या जाणाऱ्या जीवाश्म इंधनामुळे निर्माण होणाऱ्या प्रदूषणासाठी पर्यावरणपूरक उपाय आहे.पर्यायी म्हणून गोबर गॅसचा वापर केल्याने केवळ प्राण्यांचा कचरा आणि इतर सेंद्रिय कचरा लँडफिलमध्ये टाकला जात नाही तर स्वयंपाक,गरम करणे आणि प्रकाशासाठी उर्जेचा अक्षय स्त्रोत देखील उपलब्ध होतो.







### गोबर गॅस निर्मितीची प्रक्रिया:

गोबर गॅस निर्मितीची प्रक्रिया इतर कोणत्याही सेंद्रिय पदार्थाचा वापर करून बायोगॅस तयार करण्यासारखीच आहे. गोबर गॅस निर्मितीची पहिली पायरी म्हणजे शेण गोळा करणे. त्यानंतर,गोळा केलेले शेण नंतर बायोगॅस डायजेस्टरमध्ये ठेवले जाते,जिथे ते ऍनारोबिक पचन होते.या प्रक्रियेमध्ये ऑक्सिजनच्या अनुपस्थितीत सूक्ष्मजीवांद्वारे शेणाचे विघटन होते, ज्यामुळे गोबर वायूची निर्मिती होते. -उत्पादित बायोगॅसमध्ये कार्बन डायऑक्साइड (२) आणि हायड्रोजन सल्फाइड (२) सारख्या इतर वायूंसह प्राथमिक घटक म्हणून मिथेन (४) असते. वापरण्यापूर्वी, बायोगॅस अशुद्धता काढून टाकण्यासाठी आणि त्याची गुणवत्ता सुधारण्यासाठी शुद्धीकरण प्रक्रियेतून जाऊ शकते. शेवटी, शुध्दीकरणानंतर, बायोगॅस किंवा गोबर गॅस, स्वयंपाक,गरम करणे,प्रकाश व्यवस्था आणि वीज निर्मिती यासह विविध अनुप्रयोगांसाठी अक्षय ऊर्जा स्त्रोत म्हणून वापरला जाऊ शकतो. हे पारंपारिक गॅस उपकरणांमध्ये कमीतकमी बदलांसह वापरले जाऊ शकते.''

### गोबर गॅसचे फायदे:

गोबर वायू, किंवा बायोगॅस, गोबरपासून तयार केला जातो जो मुबलक प्रमाणात उपलब्ध आहे ज्यामुळे ते अक्षय ऊर्जा स्त्रोत बनते. गोबर वायू तयार करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या ऍनेरोबिक पचन प्रक्रियेमुळे गोबरमधून मिथेन उत्सर्जन कमी होण्यास मदत होते, ज्यामुळे हवामान बदलावर होणारा परिणाम कमी होतो. गोबर वायूचे उत्पादन गुरांचे खत किंवा गोबर प्रभावीपणे व्यवस्थापित करण्यास मदत करते, त्यावर उपचार न केल्यास होणारे प्रदूषण कमी करते. गोबर गॅस निर्मितीचे उप-उत्पादन, डायजेस्टेट म्हणून ओळखले जाते, पोषक तत्वांनी समृद्ध आहे आणि ते सेंद्रिय खत म्हणून वापरले जाऊ शकते, मातीचे आरोग्य वाढवते आणि रासायनिक खतांवर अवलंबून राहणे कमी करते. स्वयंपाक आणि गरम करण्यासाठी गोबर गॅस वापरल्याने लाकूड किंवा कोळशासारख्या पारंपारिक इंधनांच्या तुलनेत घरातील वायू प्रदूषण कमी होते.''

राज्य लोकतंत्र
शेत-शिवार
मंगळवार दि.२५ जून २०२४


# ‘नाफेड’ने थकविले शेतकरी उत्पादक कंपन्यांचे १५ कोटी

पुणे : खरेदी केलेल्या कांद्याचे कमिशन, मजुरी व अनामत रक्कम परत न मिळाल्याने नाशिक, नगर, पुणे व छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील १८ शेतकरी उत्पादक कंपन्यांचे तब्बल १४ कोटी ८९ लाख ६५ हजार रुपये थकित आहेत. जवळपास १५० कंपन्या अडचणीत आहेत. ‘नाफेड’ने हिशेब पूर्ण केलेला नाही. त्यामुळे मालेगाव तालुक्यातील कंपन्यांच्या सभासद शेतकऱ्यांनी आवाज उठविला आहे.

केंद्र सरकार भाव स्थिरीकरण निधी योजनेंतर्गत ‘नाफेड’ व ‘एनसीसीएफ’ या दोन संस्थांच्या माध्यमातून कांदा खरेदी करते. थेट खरेदीसाठी शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या महासंघांना हे काम दिले जाते. तर पोटखरेदीदार म्हणून क्षेत्रीय पातळीवर शेतकरी उत्पादक कंपन्या केंद्र उघडून कांद्याची खरेदी करतात. भारतीय राष्ट्रीय कृषी सहकारी विपणन संघ (नाफेड) मार्फत २०२१- २२ व २०२२-२३ या आर्थिक वर्षात अडीच लाख टन कांद्याची खरेदी करण्यात आली. खरेदीवेळी ‘नाफेड’ थेट शेतकरी उत्पादक कंपन्यांची निवड करत नाही. त्यांच्या महासंघांची निवड केल्यानंतर संस्थांना कांदा खरेदीचे आदेश दिल्यानंतर वेगवेगळ्या ठिकाणच्या शेतकरी उत्पादक कंपन्यांमार्फत शेतकऱ्यांकडून कांदा खरेदी होते. कांदा खरेदी, प्रतवारी, गोण्यांमध्ये साठवणे या सर्व कामासाठी आवश्यक मजुरांना



दर आठवड्याला पैसे द्यावे लागतात. महिला मजुरांना साधारणतः २५० ते ३०० रुपये रोज, तर पुरुषांना ४०० रुपये रोजंदारी दिली जाते. दोन वर्षांत सुमारे ५० हजार कामगारांना विविध कंपन्यांनी पैसे अदा केले आहेत. मुळात ‘नाफेड’कडून कंपन्यांना हे पैसे मिळणे अपेक्षित आहे. पण दोन वर्षांत तब्बल १३ कोटी ३ लाख ६५ हजार २७४ रुपये थकित आहेत. कांदा खरेदीच्या मोबदल्यात शेतकरी उत्पादक कंपन्यांना मिळणाऱ्या कमिशनपोटी १ कोटी ८६ लाख रुपये थकित असल्याचे या कंपन्यांच्या प्रतिनिधींनी म्हटले आहे. ‘नाफेड’ पिंपळगाव बसवंत कार्यालयाशी वारंवार चर्चा करूनही अद्याप तोडगा निघालेला नाही. त्यामुळे शेतकऱ्यांसह १५० कंपन्यांच्या प्रतिनिधींनी आंदोलनाचे हत्यार उपसण्याचा निर्णय घेतला आहे.


गुजरात, मध्य प्रदेशातून खरेदी; तेथेही गोंधळ

शेतकरी उत्पादक कंपन्यांनी कांदा खरेदी केल्यानंतर शेतकऱ्यांना तत्काळ पैसे दिले जातात. पण कांद्याची वाहतूक करण्यासाठी लावण्यात आलेल्या गाड्या, हमालांचे पैसे व कंपन्यांचे कमिशन या सर्वांचा एकत्रित हिशेब केल्यास हा आकडा १५ कोटींवर जाणारा आहे. केवळ महाराष्ट्रच नव्हे, तर गुजरात, मध्य प्रदेशातूनही कांद्याची खरेदी झाली आहे. तेथील कंपन्यांनीही ‘नाफेड’ला पत्रव्यवहार केल्याचे समजते.

‘भीक मांगो’ आंदोलनाचा इशारा

कामगारांचे पैसे अदा केले पण ‘नाफेड’कडूनच निधीअभावी पैसे मिळत नसल्याने कंपन्यांची परिस्थिती बिकट झाली आहे. वेळ पडली, तर केंद्र सरकारच्या विरोधात भीक मांगो आंदोलन करण्याचा इशारा या कंपनीच्या प्रतिनिधींनी नाव न सांगण्याच्या अटीवर दिला आहे. कष्टाचे पैसे मिळत नसल्याने थेट ‘नाफेड’च्या अध्यक्षांना पत्रव्यवहार केला आहे.

## बुलढाणा जिल्ह्यातील ११८ कृषी केंद्रांचे परवाने रद्द



बुलढाणा : बुलढाणा जिल्ह्यात नियमांना बगल देत शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या ११८ कृषी केंद्रांचे परवाने निलंबित करण्यात आले आहेत. सोबतच २०७ प्रकारच्या कृषी साहित्याच्या विक्रीवरही कृषी केंद्रातील अनियमितता पाहता बंदी घालण्यात आली आहे.

बुलढाणा जिल्ह्यात १६८२ कृषी केंद्र असून, या कृषी केंद्रांची तालुकानिहाय कृषी विभागाने तपासणी सुरू केली आहे. या तपासणीमध्ये मोठ्या प्रमाणावर काही कृषी केंद्रामध्ये अनियमितता आढळून आलेली आहे तर काही कृषी केंद्रांनी गुण नियंत्रक पथकास तपासणीस सहकार्यच केले नसल्याचे समोर आले. संधी देऊनही काही कृषी केंद्रांकडून शेतकऱ्यांची फसवणूक केली जात असल्याचे प्रकार समोर आल्याने कृषी विभागाने या प्रकरणी कारवाईचा बडगा उगारल्याचे स्पष्ट होत आहे. शेतकऱ्यांना दर्जेदार बियाणे, रासायनिक खते मिळावे व बनावट बियाण्याद्वारे शेतकऱ्यांची फसवणूक होऊ नये या दृष्टिकोनातून कृषी विभाग आणि जिल्हा परिषदेच्या कृषी विभागाने बियाणे, खतांच्या निरीक्षणाची मोहीम तालुका निहाय हाती घेतली आहे. प्रत्येक तालुक्यातील कृषी सेवा केंद्रांची तपासणी करून संबंधितांना त्रुटी दूर करण्याचे सूचित केले गेले होते. मात्र, काहींनी त्यांच्या कार्यपद्धतीमध्ये सुधारणा न केल्यामुळे ही भूमिका कृषी विभागाने घेतली आहे. ज्या कृषी केंद्रांमधील बी, बियाणे व रासायनिक खतांबाबत तपासणी पथकांना संशय आला अशा ठिकाणचे नमुने गेऊन ते प्रयोगशाळेत विश्लेषणासाठी पाठविण्यात आले. जवळपास १८८ प्रकारचे नमुने तपासणीसाठी पाठविण्यात आले असल्याचे कृषी विभागातील सूत्रांनी स्पष्ट केले. या सोबतच १० कीटकनाशकांचे नमुने आणि ५४ रासायनिक खतांचे नमुने तपासणीस पाठविण्यात आले आहेत. दरम्यान, २०७ प्रकारच्या कृषी साहित्याच्या विक्रीवरही पाहणी अंती विक्री बंदीचे आदेश देण्यात आले आहेत.

## शेतकऱ्यांना सलग तिसऱ्यांदा दिलासा

### धान, मका खरेदीच्या ऑनलाइन नोंदणीसाठी पुन्हा मुदतवाढ

भंडारा : शासकीय आधारभूत धान खरेदी योजनेत शेतकऱ्यांना त्यांनी उत्पादन केलेलं रब्बी हंगामातील धान आणि मका विकता यावा यासाठी तिसऱ्यांदा मुदतवाढ दिली आहे. यापूर्वी ३१ मे पर्यंत मुदत होती. त्यानंतर २० जूनपर्यंत ती वाढविण्यात आली होती. त्यात आता आणखी मुदतवाढ करून ती ३० जूनपर्यंत करण्यात आली आहे. मागील हंगामाच्या तुलनेत अजूनही हजारो शेतकऱ्यांची ऑनलाइन नोंदणी झालेली नसल्यानं हजारो शेतकरी शासकीय केंद्रावर धान आणि मका विक्रीपासून वंचित राहणार होते. त्यामुळं पणन महामंडळानं ३० जूनपर्यंत मुदतवाढ दिलेली आहे. त्यामुळं आता ज्या शेतकऱ्यांची ऑनलाईन नोंदणी झालेली नाही, अशांनी याचा लाभ घ्यावा, असं आवाहन भंडारा जिल्हा पणन अधिकारी सुधीर पाटील यांनी केलं आहे.

३० जूनपर्यंत मुदतवाढ, शेतकऱ्यांना दिलासा : भंडारा जिल्ह्यात धानाचं उत्पादन मोठ्या प्रमाणात घेतलं जातं. जिल्ह्यात सुमारे दीड लाखांहून अधिक शेतकरी धानाचं उत्पादन घेतात. अशातच रब्बी हंगामातील धानाची विक्री , आधारभूत किंमत धान खरेदी केंद्रांवर विक्रीसाठी नोंदणी करणे गरजेचे असतं. या ऑनलाईन नोंदणीची अंतिम मुदत ३१ मे पर्यंत होती. मात्र, यावर्षी मागील हंगामाच्या तुलनेत




अजुनही अपेक्षेप्रमाणे ऑनलाईन नोंदणी झालेली नसल्याने शासनाच्या वतीने दिलेली मुदत वाढण्याचा निर्णय घेतला आहे. आता ऑनलाईन नोंदणीची अंतिम मुदत एक महिन्याने वाढवून ३१ जूनपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. त्यामुळे आता धान उत्पादक शेतकऱ्यांनी रब्बी हंगामाच्या धान विक्रीकरिता त्यांची नोंदणी नजिकच्या केंद्रावर करावी, असं आवाहन जिल्हा पणन अधिकारी यांनी केलं आहे. शेतकऱ्यांनी पेरणीची घाई करु नये, कृषी विभागाचं आवाहन : दुसरीकडे राज्याच्या काही भागात चांगला पाऊस झाला आहे. त्यामुळं पेरणीच्या कामांना वेग आला आहे. दरम्यान, काही भागात अद्यापही पेरणी योग्य पाऊस झालेला नाही. त्यामुळं शेतकऱ्यांना अजूनही पेरणीयोग्य पावसाची प्रतीक्षा कायम आहे. दरम्यान, बुलढाणा जिल्ह्याच्या जळगाव जामोद तालुक्यात पेरणीला सुरुवात झाली आहे. तर जिल्ह्यातील इतर तालुक्यांमध्ये अजूनही पेरणी योग्य पाऊस झाला नाही. दरम्यान, शेतकऱ्यांनी योग्य पावसाशिवाय पेरणीची घाई करु नये असं आवाहन कृषी अधीक्षक मनोजकुमार ढगे यांनी केलं आहे. १०० मिलिमीटर पाऊस पडल्याशिवाय शेतकऱ्यांनी पेरणी करू नये : गेल्या चार-पाच दिवसांपासून बुलढाणा जिल्ह्याच्या विविध भागात विजांच्या कडकडाटासह मुसळधार पाऊस पडत आहे. यामध्ये खामगाव, शेगाव, देऊळगाव राजा, चिखली, जळगाव जामोद या तालुक्यांमध्ये आतापर्यंत जवळपास ७० मिलिमीटर पाऊस पडलेला आहे. त्यामुळं या तालुक्यातील शेतकऱ्यांनी खरिपाच्या पेरणीला सुरुवात केली आहे. तर इतर तालुक्यांमध्ये कमी पाऊस पडल्याने शेतकरी आता पेरणीयोग्य पावसाची वाट पाहत आहेत. तर दुसरीकडे १०० मिलिमीटर पाऊस पडल्याशिवाय शेतकऱ्यांनी पेरणी करू नये असे आवाहन कृषी विभागाकडून करण्यात येत आहे.

## वेगवेगळ्या कालावधीत पक्क होणारे मक्याचे सुधारीत वाण

महाराष्ट्रात मका तृणधान्य म्हणून खरीप व रब्बी हंगामात घेतली जाते. यात उपयुक्ततेनुसार काही मक्याचे वाण तृणधान्य म्हणून पशुखाद्य व कुक्कुट खाद्य आणि प्रक्रिया उद्योगात वापरली जाते. तर काही वाण जनावरांचा चारा तसेच काही बेबी कॉर्न, स्वीट कॉर्न तर काही पॉपकॉर्न म्हणून लागवड केले जाते. मक्याच्या वाणानुसार त्याचा पक्क होण्याचा कालावधी वेगवेगळा असतो. जाणून घेऊ या वेगवेगळ्या कालावधीनुसार मक्याचे सुधारित वाण.

१) उशिरा पक्क होणारे संकरीत वाण : बायो-९६८१: पिवळा दाणा असलेला मक्याच्या या वाणाचे सरासरी धान्य उत्पादन ६० ते ७० किलोग्रॅम प्रति हेक्टर आहे. एच क्यु पी एम-१: हा वाण पिवळा दाणा असलेला, अर्ध खळीदार, गुणात्मक संकरित वाण, करपा व खोडकिडीस प्रतिकारक आहे. या वाणाचे सरासरी धान्य उत्पादन ६० ते ६५ किलोग्रॅम प्रति हेक्टर आहे. एच क्यु पी एम-५ नारंगी दाणा असलेला हा मक्याचा गुणात्मक संकरीत वाण आहे. हा वाण करपा व खोडकिडीस प्रतिकारक असून सरासरी धान्य उत्पादन ५५ ते ६० किलोग्रॅम प्रति हेक्टर आहे. संगम : नारंगी दाणा असलेल्या या वाणाचे सरासरी धान्य उत्पादन ७५ ते ८० किलोग्रॅम प्रति हेक्टर आहे. कुबेर : नारंगी पिवळा दाणा असलेल्या या वाणाचे सरासरी धान्य उत्पादन (कि./हे.) ७५ ते ८० किलोग्रॅम



प्रति हेक्टर आहे.

२) मध्यम कालावधीत पक्क होणारे वाण : राजर्षि : नारंगी पिवळा दाणा असलेला हा वाण करपा व खोडकिडीस प्रतिकारक असून खरीप व रब्बी हंगामासाठी योग्य आहे. या वाणाचे सरासरी धान्य उत्पादन ७० ते ७५ (खरीप) आणि ९५ ते १०० (रब्बी) किलोग्रॅम प्रति हेक्टर आहे. बायो-९६३७ : नारंगी दाणा असलेल्या या वाणाचे सरासरी धान्य उत्पादन हे ७० ते ७५ किलोग्रॅम प्रति हेक्टर आहे.

फुले महर्षि : नारंगी पिवळा दाणा असलेला हा वाण, अर्ध खळीदार, खरीप हंगामासाठी योग्य आहे. या वाणाचे सरासरी धान्य उत्पादन (कि./हे.) ७५ ते ८० किलोग्रॅम प्रति हेक्टर आहे.

३) लवकर व अति लवकर पक्क होणारे वाण : पुसा संकर मका-१ : नारंगी पिवळा दाणा असलेला हा वाण, खरीप हंगामासाठी शिफारस करण्यात आलेला असून याचे सरासरी धान्य उत्पादन ४० ते ५० किलोग्रॅम प्रति हेक्टर आहे. विवेक संकरीत मका-२१ : पिवळा दाणा असलेला हा वाण, अर्ध खळीदार असून याचे सरासरी धान्य उत्पादन ४५ ते ५० किलोग्रॅम प्रति हेक्टर आहे. विवेक संकरीत मका-२७ : पिवळा दाणा असलेले हे वाण, अर्ध खळीदार असून याचे सरासरी धान्य उत्पादन ५० ते ५५ किलोग्रॅम प्रति हेक्टर आहे. महाराजा : नारंगी दाणा असलेल्या या वाणाचे सरासरी धान्य उत्पादन ६० ते ६५ किलोग्रॅम प्रति हेक्टर आहे.

४) संमिश्र वाण उशिरा पक्क होणारे वाण : आफ्रिकन टॉल : हा वाण हिरव्या चाऱ्यासाठी उत्तम असून याची पाने लांब, १० ते १२ फूट उंच असून हा वाण करपा रोगास प्रतिकारक आहे. सरासरी उत्पादन ६० ते ७० टन हिरवा चारा (४० ते ५० क्वि. धान्य) प्रति हेक्टर एवढे आहे.

मधु मका वाण : या वाणाला फुले मधू असे सुद्धा म्हणतात. यात साखरेचे प्रमाण (ब्रिक्स) १४.८९% असते. हिरवी कणसे ८० ते ८५ दिवसात काढणीस तयार होतात. सरासरी धान्य उत्पादन खरीप हंगामात १२५ ते १३० किलोग्रॅम प्रति हेक्टर आहे. (हिरवी कणसे आवरणसहीत)

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१२६० : दिल्ली येथील सल्तनत साम्राज्याचे पहिले सुलतान कुतुबुद्दीन ऐबक यांचा तत्कालीन भारतातील लाहोर या प्रांतात राज्याभिषेक करण्यात आला.
१४४१ : इटन कॉलेजची स्थापना.
१५७१ : मिगेल लोपेझ दि लेगाझ्पीने मनिला शहराची स्थापना केली.
१७९३ : फ्रान्समधील पपहिल्या प्रजासत्ताक घटनेचा अवलंब केला गेला.
१८८० : ओ कॅनडाचे हे गाणे कॅनडाचे राष्ट्रगीत म्हणून पहिल्यांदा गायले गेले.
१९३९ : सयामचे थायलँड असे नामकरण करण्यात आले.
१९४० : दुसरे महायुद्ध फ्रान्स व इटलीमधे शस्त्रसंधी झाली.
१९६१ : भारतात निर्मित स्वदेशी एच. एफ २४ सुपर सोनिक लढाऊ विमानाणे भरारी घेतली.
१९६६ : मुंबईहून न्यूयॉर्कला जाणाऱ्या एयर इंडियाच्या विमान स्वित्झर्लंड देशांतील माउंट ब्लांकमध्ये दुर्घटनाग्रस्त झाल्यामुळे ११७ नागरिक ठार झाले.
१९८२ : कर्नाटकातील सर्व शाळांत कन्नड भाषा शिकविण्याची सक्ती करण्यात आली.
१९९६ : मायकेल जॉन्सनचा १९.६६ सेकंदांत २०० मीटर धावून विश्वविक्रम.
१९९८ : अभिनेते चंद्रकांत मांडरे यांना अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाचा ‘चित्रभूषण पुरस्कार’ जाहीर
२००१ : ’आय. एन. एस. विराट’ ही भारतीय नौदलाची एकमेव विमानवाहू नौका आधुनिकीकरणानंतर पुन्हा नौदलात दाखल झाली.
२००४ : न्यू यॉर्क राज्यात मृत्युदंड असंवैधानिक ठरवण्यात आला.
२०१० : जुलिया गिलार्ड यांनी ऑस्ट्रेलियाच्या पहिल्या महिला पंतप्रधान म्हणून पदभार स्वीकारला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८६३ : प्रसिद्ध महाराष्ट्रीयन इतिहासाचार्य इतिहासकार, अभ्यासक, लेखक, भाष्यकार आणि वक्ते विश्वनाथ काशिनाथ राजवाडे यांचा जन्मदिन.
१८६२ : रविकिरण मंडळाचे संस्थापक श्रीधर बाळकृष्ण रानडे यांचा जन्म. (मृत्यू: २१ मार्च १९७४)
१८६९ : दामोदर हरी चाफेकर चार्ल्स रँड याची हत्या करणारे (मृत्यू: १८ एप्रिल १८९८)
१८९२ : श्रीधर बाळकृष्ण रानडे रविकिरण मंडळाचे संस्थापक (मृत्यू: २१ मार्च १९७४)
१८९७ : पण्डित ओंकारनाथ ठाकूर ऊर्फ ’प्रणव रंग’ गायक व संगीत अभ्यासक, १९५५ मधे पद्मश्री पुरस्काराने सन्मानित (मृत्यू: २९ डिसेंबर १९६७)
१८९३ : द वॉल्ट डिस्नी कंपनी चे सह-संस्थापक रॉय ओ. डिस्नी यांचा जन्म. (मृत्यू: २० डिसेंबर १९७१)
१८९९ : मर्दानी रुप, तिन्ही सप्तकांतुन सहजपणे फिरणारा आवाज या देणग्या लाभलेले व गंधर्वयुगाची स्मृती जागवणारे नटवर्य गोपाळ गोविंद ऊर्फ नानासाहेब फाटक यांचा जन्म (मृत्यू: ८ एप्रिल १९७४)
१९०८ : गुरू गोपीनाथ कथकली नर्तक (मृत्यू: ९ आक्टोबर १९८७)
१९२७ : तामिळ लेखक कवियरासू कन्नडासन यांचा जन्म. (मृत्यू: १७ ऑक्टोबर १९८१)
१९२८ : मृणाल गोरे समाजवादी नेत्या आणि ६ व्या लोकसभेच्या सदस्य (मृत्यू: १७ जुलै २०१२)
१९३७ : ज्येष्ठ लेखिका अनिता मुजूमदार देसाई यांचा मसुरी येथे जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१५५४ : भारतीय इतिहास कालखंडातील प्रसिद्ध वीरांगना गोंडवाना राज्याच्या राज्यकर्त्या राणी दुर्गावती यांचे निधन.
१८८१ : हिंदू मठाधिपती, समाजसुधारक व लेखक तसचं, आधुनिक पंजाबी गद्याचे जनक पंडित श्रद्धाराम शर्मा यांचे निधन.
१९०८ : अमेरिकन राजकारणी व अमेरिकेचे माजी अध्यक्ष स्टीफन ग्रोव्हर क्लेव्हलँड यांचे निधन. अमेरिकन इतिहासातील एकमेव राष्ट्रपती होते ज्यांनी राष्ट्रपती पदाचा सलग दोनवेळा कारभार सांभाळला.
१९१४ : वासुदेव गणेश टेंबे उर्फ टेंबे स्वामी किंवा वासुदेवानंद सरस्वती यांचा गरुडेश्वर, बडोदा, गुजरात येथे निधन. (तारखेप्रमाणे)
१९४७ : बौद्ध धर्माचे अभ्यासक पंडित धर्मानंद कोसंबी यांचे निधन. (जन्म: ९ ऑक्टोबर १८७६)
१९८० : स्वतंत्र भारताचे चोथे राष्ट्रपती वराहगिरी व्यंकटा गिरी उर्फ वी. वी. गिरी यांचे निधन.
१९९७ : संयुक्ता पाणिग्रही ओडीसी नर्तिका (जन्म: २४ ऑगस्ट १९४४)
२०१३ : इटलीचे वे४० पंतप्रधान एमिलियो कोलंबो यांचे निधन. (जन्म: ११ एप्रिल १९२०)

## तेलंगणात काँग्रेस सरकारनं कर्जमाफीचा निर्णय घेतला, महाराष्ट्रातही कर्जमाफी व्हावी

तेलंगणामध्ये काँग्रेस सरकारने शेतकऱ्यांची कर्जमाफीचा करण्याचा निर्णय घेतला आहे. महाराष्ट्रात देखील कर्जमाफी व्हावी, अशी आमची मागणी असल्याचे वक्तव्य किसान सभेचे नेते डॉ. अजित नवले यांनी केलं आहे. याआधी कर्जमाफी करण्यात आली मात्र, त्यात अटी शर्ती इतक्या लागू केल्या की लाखो शेतकरी कर्जमाफीपासून वंचित राहिले होते. त्यामुळं आता जर सरकार कर्जमाफी करणार असेल तर अटी शर्तींच्या बाबतीत सरकारने योग्य तो निर्णय घ्यावा. शेतकऱ्यांची फसवणूक करु नये असे अजित नवले म्हणाले.

४० लाख शेतकऱ्यांची कर्जमाफी

तेलंगणामधील काँग्रेस सरकारने ४० लाख शेतकऱ्यांची कर्जमाफी करण्याचा मोठा निर्णय घेतला आहे. मुख्यमंत्री रेवंथा रेड्डी यांनी ३१ हजार कोटींच्या शेती कर्जमाफीला मंजुरी दिली आहे. शेतकऱ्यांना कर्ज माफी देण्याची घोषणा काँग्रेसने आपल्या निवडणूक जाहीरनाम्यात दिली होती. त्याप्रमाणं सरकारनं मोठा निर्णय घेतला आहे. तेलंगणा मंत्रिमंडळाची बैठक मुख्यमंत्री रेवंत रेड्डी यांच्या अध्यक्षतेखाली झाली होती. यात ३४ हजार कोटी रुपयांच्या कृषी कर्ज माफीस मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. १५ ऑगस्टपूर्वी शेतकऱ्यांचे कर्ज सरकार माफ करेल, असे आश्वासन मुख्यमंत्री रेवंथ रेड्डी यांनी दिले आहे.

तेलंगणा सरकारने ३४ हजार कोटींची कर्जमाफी केली आहे.

# धोकादायक वर्गखोल्या; विद्यार्थ्यांचे जीव गेल्यावरच जाग येणार का?

## सीईओ अविनाश पाठक यांना निवेदन-डॉ.गणेश ढवळे

**बीड । प्रतिनिधी**

**बीड जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या अकरा तालुक्यातील ३४९ शाळांच्या ५९२ वर्गखोल्या अत्यंत धोकादायक असुन ४६८ शाळांमधील ८५६ वर्गखोल्यांची तातडीने दुरुस्ती करणे आवश्यक असुन ग्रामीण भागातील ७७२ शाळांना वीजपुरवठा नाही तर थकीत वीज बिलामुळे ६२० शाळांमधील वीजपुरवठा खंडित केला असुन विद्यार्थ्यांचे संगणक,ई लर्निंग,वीज उपकरणे बंद असल्याने डिजिटल शैक्षणिक नुकसान होत असुन तातडीने उपाययोजना करण्यात यावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर , शेख युनुस च-हाटकर,शेख मुबीन यांनी अविनाश पाठक मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड यांच्या मार्फत मुख्यमंत्री ,शालेय शिक्षणमंत्री, पालकमंत्री बीड यांना केली आहे. सीईओ अविनाश पाठक यांनी भविष्यात शाळांच्या दुरुस्ती व पुन: बांधणीसाठी मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध करून देण्यात येणार असुन तातडीने दुरुस्ती करण्यात येईल असे आश्वासन दिले.**

बीड जिल्ह्यात जिल्हा परिषदेच्या २४७४ शाळा असुन यात २४१५ शाळा प्राथमिक तर ५९ शाळा माध्यमिक आहेत.जिल्ह्यात ११ तालुक्यातील ३४९ शाळांच्या ५९२ वर्गखोल्या धोकादायक असुन मोठा पाऊस अथवा वादळवारे आल्यास धोका निर्माण होऊ शकतो.जिल्हा परीषदेच्या शाळांच्या ईमारतीची दुरावस्था असुन कुठे भिंती कुजलेल्या अवस्थेत तर कुठे छत उघडे पडलेले तर कुठे दरवाजे, खिडक्या मोडकळीस आलेल्या अवस्थेत आहेत.गेल्या अनेक वर्षांपासून शाळा, वर्गखोल्यांची दुरुस्ती आवश्यक असताना लोकप्रतिनिधी व प्रशासनाचे याकडे दुर्लक्ष झाल्याने तसेच वेळेवर निधी उपलब्ध न झाल्याने शालेय मुलांची अडचण होत असुन दुर्घटना घडल्यास यास जबाबदार कोण?? लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाकडून विद्यार्थ्यांच्या जीवाशी खेळ सुरू आहे त्यामुळे तातडीने धोकादायक शाळांच्या दुरूस्तीसाठी निधी देण्यात येऊन तात्काळ दुरुस्ती करण्यात यावी.






आष्टी तालुका ८० शाळांमधील ११९ वर्गखोल्या, अंबेजोगाई तालुक्यातील १६ शाळांमधील ३० वर्गखोल्या, बीड तालुक्यातील २८ शाळांमधील ३७ वर्गखोल्या,धारूर तालुक्यातील १७ शाळांमधील ३० वर्गखोल्या,केज तालुक्यातील १९ शाळांमधील २२ वर्गखोल्या, गेवराई तालुक्यातील ६२ शाळांमधील १२५ वर्गखोल्या, माजलगाव तालुक्यातील १३ शाळांमधील २६ वर्गखोल्या, परळी तालुक्यातील ४६ शाळांमधील ८८ वर्गखोल्या, पाटोदा तालुक्यातील ३१ शाळांमधील ४० वर्गखोल्या, शिरूर तालुक्यातील २४ शाळांमधील ३२ वर्गखोल्या, वडवणी तालुक्यातील १३ शाळांमधील ४३ वर्गखोल्या एकुण ३४९ शाळांमधील ५९२ वर्गखोल्या मोडकळीस आलेल्या असुन त्यांची तातडीने दुरुस्ती आवश्यक आहे. बीड तालुक्यातील मांडवजाळी ग्रामपंचायत अंतर्गत पिंपळवाडी केंद्र अंतर्गत वायकर वस्ती येथील शाळेच्या एका वर्गाचे छत पुर्णपणे कोसळले असुन सध्या ज्या वर्गात मुलं ज्ञानार्जन करत आहेत त्या वर्गातील छत पडण्याच्या अवस्थेत असुन मुलांच्या जिवीताला धोका असुन शेतकरी ऊसतोड मजुरांच्या लेकरांनी पावसाळ्यात शाळा उघड्यावर कशी शिकायची असा संतप्त सवाल पालक दादु पवार,सुशीला बहिरवाळ, अमोल बहिरवाळ यांनी केला आहे. बीड जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या ग्रामीण भागातील ७७२ शाळांना वीजपुरवठाच नाही तर जिल्ह्यातील ४९७ जिल्हा परिषद प्राथमिक शाळांकडे १ कोटी ३ लाख ४५ हजार रुपयांचे वीज बिल थकीत असल्याने महावितरण कंपनीने वीज कनेक्शन कट करण्याची कारवाई केली आहे. त्यामुळे संगणक,ई लर्निग,एल ई डी टीव्ही, डिजिटल बोर्ड तसेच वीजेची उपकरणे बंद असल्याने विद्यार्थ्यांचे डिजिटल शैक्षणिक नुकसान होत आहे तसेच बहुतेक शाळात अंधार आहे.अनेक शाळांच्या मागील भागात गवत आणि झाडेझुडपे असतात त्यातुन कधी विंचु तर कधी सापही शाळेत येतात. अंधार असल्याने अनेकदा दिसत नाहीत.वीज असेल तर अशा प्रकारचा धोका होणार नाही.शासनाने या विषयाकडे गांभीर्याने पाहणे आवश्यक आहे.

# जिल्हाबाहेरुन येणाऱ्या नागरिकांचे आधारकार्ड मतदानकार्डाला लिंक करा-भाई थावरे

**माजलगाव । प्रतिनिधी**

**बीड जिल्ह्यातील नागरिक अनेक वर्षांपासून मुंबई, पुणेसह इतर जिल्हयात स्थायिक झाले आहेत. यामुळे त्यांचे ते वास्तव्यास असलेल्या जिल्ह्यात आणि बीड जिल्ह्यातही त्यांचे मतदान यादीत नाव आहे. यामुळे बाहेर जिल्ह्यात स्थायिक झालेले नागरिक दोन ठिकाणी मतदानाचा हक्क बजावतात. यामुळे बीड जिल्ह्यातील जल्ह्यातून बाहेर जिल्ह्यात स्थायिक झालेल्या नागरिकांचे मतदानकार्ड आधारकार्डला लिंक करावे अशी मागणी भाई गंगाभिषण थावरे यांनी केली आहे.**

थावरे म्हणाले की, माजलगाव मतदारसंघातील जवळपास ३० ते ३५ हजार नागरिक मुंबई, पुणे तसेच इतर जिल्ह्यात नोकरी, शिक्षण, व्यवसायानिमित्त अनेक वर्षांपासून स्थायिक झाले आहेत. दहा ते पंधरा वर्षांपासून विविध जिल्ह्यात स्थायिक झाल्याने त्यांचे स्थायिक झालेल्या जिल्हयातील मतदार यादीत नाव आहे तसेच ते बीड जिल्ह्यातील जल्ह्यातील रहिवासी असल्याने त्यांचे बीड जिल्ह्यातील मतदार यादीतही नाव आहे. निवडणूक काळात राजकीय पक्षांकडून बाहेर जिल्ह्यात राहणाऱ्या मतदारांना पैशांचे अमिष दाखवून त्यांना बीड जिल्ह्यात बोलावून त्यांचे मतदान करुन घेतले जाते. यामुळे मोठ्या प्रमाणात आर्थिक व्यवहार करुन बाहेर जिल्ह्यातील मतदान विकत घेतले जाते.



याचा परिणाम जिल्ह्यातील मतदान प्रक्रियेवर होतो. बीड जिल्ह्याच्या आिण बाहेरील जिल्ह्याच्या मतदार यादीत असे दोन्ही ठिकाणीच्या मतदार यादीत त्यांचे नाव असते. यामुळे निवडणूक आयोगाने मतदारांचे आधारकार्ड मतदानकार्डासोबत लिंक करावे. जेणे करुन संबंधीत मतदाराचे नाव दोन मतदार यादीत आहे का याचे निष्पन्न होईल. असे प्रकार उघडकीस आल्यास त्यांचे नाव एका मतदारयादीतून कमी करावे अशी मागणी भाई गंगाभिषण थावरे यांनी केली असून या प्रकरणी मुख्य निवडणूक आयोगाला निवेदन देणार असल्याचे थावरे म्हणाले.

# उपळी हायस्कूल उपळी मध्ये विद्यार्थ्यांना घेऊन एसटी महामंडळाने मुलींचे केले स्वागत

## धारूर आगाराचा स्तुत्य उपक्रम

**वडवणी । प्रतिनिधी**

वडवणी तालुक्यामध्ये सर्व शाळांमध्ये मानव विकास योजनेअंतर्गत व अहिल्याबाई होळकर योजनेअंतर्गत सर्व विद्यार्थीनींना पास शाळेमध्येच पोहोच करण्यात आल्या यामुळे मुलींचा व शाळेच्या वेळेची बचत झाली ना विद्यार्थ्यांना तास बुडवून पास आणावयास जावे लागले किंवा त्या शाळेतील शिक्षकांना शाळा सोडून पास आणण्याची गरज पडली नाही.यासाठी धारूर आकाराचे आगार प्रमुख नवनाथ चौरे साहेब यांनी विद्यार्थ्यांना त्यांच्याच शाळेमध्ये पास उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न केले आणि त्यानुसार उपळी हायस्कूल




उपळी मध्ये शाळेचे कोषाध्यक्ष शेख मयूर सर यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेचे मुख्याध्यापक बडे भागवत सर यांच्या उपस्थितीमध्ये उपळी हायस्कूल उपळी मध्ये मानव विकास योजनेअंतर्गत बसच्या पास उपलब्ध करून दिल्यामुळे मुली आनंद व्यक्त करत होत्या यावेळी बस वाहक मुळे अशोक, शाळेचे मुख्याध्यापक भागवत बडे सर, शेख मयूर सर यांच्यासह पर्यवेक्षक शंकर घाडगे, प्रकाश गोरे, सावंत भागवत, हनुमान बडे, वाघ कालिदास,रमेश शेप, जाधव अशोक,सपकाळ बाळासाहेब,गोरे महादेव, जाधव वसुवैभव श्रीमती गायसमुद्रे सुनीता,श्रीमती परविन शेख, श्रीमती सौंदरमल प्रज्ञा, इचके रामप्रसाद शेख जफर या शाळेतील विद्यार्थिनी उपस्थित होत्या यावेळी शाळेच्या वतीने वाहक व चालक यांचे आभार मानले आणि उत्तम सेवा देत आहेत यामुळे त्यांचे आभार मानले.

# गोगलगायी या किडीच्या नियंत्रणासाठी कृषि विभाग सज्ज

**बीड । प्रतिनिधी**

**जिल्ह्यामध्ये शेतकऱ्यांच्या बांधावर/शेतात काही ठिकाणी गोगलगायी आढळून येत आहेत. त्यासाठी कृषि विभाग सज्ज झाला असून जिल्ह्यात ४१५० किलो मेटाल्डीहाईड या कीटकनाशकाचा साठा राज्यस्तरावरून प्राप्त झाला आहे.**

सदर साठा संबधित तालुका कृषि अधिकारी तसेच नजीकचे तालुका बीज गुणन केंद्र व शासकीय फळरोपवाटिका याठिकाणी ठेवण्यात आलेला आहे. त्यातून जिल्ह्यातील २०७५ एकर एवढ्या क्षेत्राचे सहज संरक्षण होईल. गोगलगायीचा प्रादुर्भाव आटोक्यात आणण्यासाठी शेतकऱ्यांनी प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून पेरलेल्या सोयाबीन शेताची विशेषता बांधाचे निरीक्षण करावे, बांध स्वच्छ ठेवावे, बांधावर गोगलगायी आढळल्यास शेतात संध्याकाळच्या वेळेस जागोजागी गवताचे ढीग अथवा गुळाच्या पाण्यामध्ये रिकामे बारदाने भिजवून ठेवावे. सकाळी त्या ढीगांखाली लपलेल्या गोगलगायी जमा करून मिठाच्या पाण्यात टाकून नष्ट कराव्यात. नियंत्रणात्मक उपाययोजना म्हणून मेटाल्डीहाईड या कीटकनाशकाच्या गोळ्या २ किलो प्रती एकर या प्रमाणात बांधाच्या नजीकच्या भागात / प्रादुर्भावग्रस्त क्षेत्रात वापराव्यात. जेणे करून गोगलगायी या किडीचा प्रादुर्भाव रोखणेस मदत होईल. कीटकनाशक मुरमूऱ्यांना लावून शेतामध्ये फेकू नये, त्याने पशु-पक्षी यांना हानी होऊ शकते असाही सावधानतेचा इशारा देण्यात आला आहे.अधिक माहितीसाठी आपल्या स्थानिक क्षेत्राचे, कृषि सहाय्यक, कृषि पर्यवेक्षक, मंडळ कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी यांना संपर्क करावा तसेच अधिक तांत्रिक माहितीसाठी कृषि विज्ञान केंद्र डिघोळअंबा,ता.अंबाजोगाई वा कृषि विज्ञान केंद्र खामगाव, ता.गेवराई येथील शास्त्रज्ञ यांचेशी संपर्क करावा. असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, बीड यांनी केले आहे.

# ऊसतोड मुलांचे शासकीय वस्तीगृहात प्रवेश घेण्याचे आवाहन

बीड: महाराष्ट्र राज्य कामगार कल्याण महामंडळामार्फत संत भगवान बाबा ऊसतोड मुलांचे शासकीय वस्तीगृह नाळवंडी नाका बीड येथे कार्यरत असून या वस्तीगृहाचे प्रवेश क्षमता १०० असून सदर वस्तीगृहाचे प्रवेश प्रक्रिया सुरू झालेली आहे.या वस्तीगृहात ऊसतोड कामगारांच्या मुलांना प्रवेश दिला जातो या वस्तीगृहात प्रवेशातील विद्यार्थ्यांना मोफत भोजन व निवास सुविधा पुरविली जाते तसेच निर्वाह भत्ता, स्टेशनरी इत्यादी सुविधा पुरविला जातात, इच्छुकांनी त्वरित संपर्क करून प्रवेश अर्ज घेऊन जावेत, असे आवाहन सहाय्यक आयुक्त समाज कल्याण बीड व गृहपाल संत भगवान बाबा ऊसतोड मुलांचे शासकीय वस्ती, नाळवंडी बीड यांनी केले आहे संपर्कासाठी मोबाईल क्रमांक ९८६०१५७३६४ यावर संपर्क साधावा.

# रविशंकर विद्या मंदिर येथे श्रद्धा कोर्स

**बीड । प्रतिनिधी**

**२१ जुन रोजी योगा दिवस असल्या कारणाने त्याची पुर्व तयारी म्हणून शहरातील श्री श्री रविशंकर विद्या मंदिर येथे दि १० जुन २०२४ ते १३ जून २०२४ च्या दरम्यान आर्ट ऑफ लिव्हींग आयोजित श्रद्धा कोर्स पार पडला.सर्व शिक्षक वृंदासाठी संस्थेच्या प्रमुखांनी आणि मुख्याध्यापकांनी श्रद्धा कोर्सचे आयोजन केले होता.हा कोर्स घेण्यासाठी भूगाव,पुणे येथील श्री श्री रविशंकर विद्यामंदिरच्या मुख्याध्यापिका स्मिता रहाणे प्रमुख अतिथी होत्या.**

या कोर्सचे स्वरूप सकाळी पहाटे प्राणायाम ,योगासने ,हरी ओम ध्यान सुदर्शन क्रिया सत्संग विशेष ऍक्टिव्हिटी. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास कशा प्रकारे करता येईल हे या कोर्सचे मुख्य उद्दिष्ट होते.यावेळी संस्थेचे अध्यक्ष श्री जैन सर सचिव श्री पारगावकर सर मुख्याध्यापक हंसे सर उपमुख्याध्यापिका अनिता सूर्यवंशी मॅडम तसेच आर्ट ऑफ लिविंग परिवाराचे सर्व सदस्य उपस्थित होते.



तसेच दरम्यान शाळेतील सर्व शिक्षकांना चहा नाश्ता आणि जेवणाची उत्तम सोय शाळेच्या वतीने करण्यात आली होती. शाळेच्या उपमुख्याध्यापिका अनिता सूर्यवंशी मॅडम यांनी स्मिता रहाणे यांचा सत्कार शाल, श्रीफळ आणि विशेष भेटवस्तू देऊन केला. श्री श्री रविशंकर विद्या मंदिर येथे विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी व सर्वांगीण विकासासाठी अशा विविध उपक्रमांचे नेहमी आयोजन करण्यात येत असते.यावेळी शाळेतील सर्व शिक्षक वृंद व कर्मचारी वृंद उपस्थित होते.

# गांजपूर ग्रामस्थांनी भरवली गटशिक्षणाधिकारी कार्यालया समोर शाळा शिक्षकांच्या रिक्त जागा भरण्याची मागणी

**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

**तालुक्यातील गांजपूर येथील पालकानी विद्यार्थ्यांची शाळा शाळेतील शिक्षकांच्या जागा रिक्त असल्यामुळे गटशिक्षणाधिकारी कार्यालया समोर भरवली व शिक्षकांच्या रिक्त जागा भरल्या शिवाय येथून विद्यार्थी न हलवण्याचा निर्णय घेतला यामुळे शिक्षक नियुक्ती करावी अशी मागणी या पालक वर्गातून होत आहे.**

धारूर तालुक्यातील गांजपूर येथे पहिली ते सातवी पर्यंत जि.पं. ची शाळा असून ५५ विद्यार्थी संख्या आहे. मात्र दोनच शिक्षक येथे कार्यरत आहेत या शाळेमध्ये तात्काळ शिक्षक नियुक्तीची मागणी वारंवार पालकांनी करून ही गटशिक्षणाधिकारी कार्यालय




याकडे दुर्लक्ष करत असल्यामुळे या पालकांनी २४ जुन रोजी सोमवारी गटशिक्षण अधिकारी कार्यालया समोरच विद्यार्थ्यांची शाळा भरवली व शिक्षक नियुक्त केल्या शिवाय माघार न घेण्याचा निर्धार घेतला शिक्षक समितीच्या अध्यक्ष माहेश्वरी डापकर पालक दादासाहेब शिरसाट अर्जुन विटेकर माणिक मुंडे यांच्यासह विद्यार्थी व पालक या ठिकाणी कार्यालयाने बराच वेळ या विद्यार्थी व पालकांकडे लक्षणे न दिल्याचे लक्षात आले गटशिक्षणाधिकारी कार्यालय व वरिष्ठ अधिकाऱ्यांनी लक्ष घालावे व येथे शिक्षक नियुक्त करून विद्यार्थ्यांचे नुकसान टाळावे नसता हे आंदोलन तीव्र स्वरूपाचे करण्यात येईल असा इशारा या पालकानी दिला आहे.

# माजी शिक्षण सभापती उद्धव (बाप्पू ) दरेकर यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्याचे आयोजन

**कडा । प्रतिनिधी**

**जिल्ह्याच्या राजकारणातील भिष्माचार्य म्हणून ओळखले जाणारे माजी आमदार साहेबराव दरेकर नाना यांचे जेष्ठ चिरंजीव माजी शिक्षण सभापती उद्धव बापू दरेकर यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने भव्यदिव्य अभिष्टचिंतन कार्यक्रमाचे आयोजन दि २६ जून रोजी सायंकाळी ७.०० वाजता मोरया मंगल कार्यालय सुलेमान देवळा येथे करण्यात आले आहे.**



गरिबांचे कैवारी,आबालवृद्धचे आधारस्तंभ , समाजसेवक असे अनेक उपादी दिल्या तरी ज्यांच्यासाठी कमीच आहेत असे बीड जिल्हा परिषदेचे शिक्षण सभापती उद्धव (बाप्पू ) दरेकर यांनी आपल्या नेतृत्व, कर्तृत्वाच्या वक्तृत्व या त्रिवेणी संगमाच्या जोरावर आपल्या कार्याची वेगळी ओळख निर्माण करून राजकारणात आपला एक दबदबा निर्माण केला आहे आष्टी विधानसभा मतदारसंघात कोणत्याही परिस्थितीत जनमानसाच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहून प्रत्येकाच्या सुखादुःखात नेहमी आधार देत आहेत उद्धव (बाप्पू ) दरेकर यांच्या वाढदिवसानिमित्त आष्टी तालुक्यातील सुलेमान देवळा येथे येथे २६ जूनला भव्य अभिष्टचिंतन सोहळयाचे आयोजन केले आहे.या सोहळयासाठी नवनिर्वाचित खासदार बजरंग सोनवणे,माजी मंत्री शिवाजीराव कर्डीले,आमदार संदिप क्षीरसागर, आमदार रोहित दादा पवार, युवक प्रदेशाध्यक्ष मेहबूब शेख, माजी महापौर अभिषेक कळमकर, उ.बा.ठा शिवसेना जिल्हाप्रमुख शशिकांत गाडे सर,यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत, या अभिष्टचिंतन सोहळ्यास तालुक्यांमधील तमाम जनतेने उपस्थित राहण्याचे आवाहन माजी सरपंच केशव चव्हाण,भरत घोडके अभिजित जंजिरे, अशोक गाडे व उद्धव बाप्पू दरेकर मित्रमंडळाच्या वतीने करण्यात येत आहे.

# बांधकाम कामगारांची ऑनलाईन प्रणालीद्वारे नोंदणी सुरु

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ बीड अंतर्गत नोंदीत सक्रिय जीवित बांधकाम कामगारांसाठी सुरक्षा, आरोग्य, शैक्षणिक व सामाजिक कल्याणाशी संबंधित योजना राबविल्या जात आहेत. या मंडळामध्ये बांधकाम कामगारांची ऑनलाईन प्रणाली द्वारे नोंदणी केली जात असून त्यासाठी मंडळाची .. ही वेबसाईट कार्यरत आहे. नोंदणीत बांधकाम कामगारांची मंडळात नोंदणी करण्यासाठी एक रुपया एवढी नाममात्र शुल्क आकारले जाते. बांधकाम कामगारांची मंडळात नोंदणी झाल्यानंतर तो पात्र असलेल्या योजनांचे लाभ विनाशुल्क प्रदान केले जातात.

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडे नोंदीत असलेल्या बांधकाम कामगारांना कामाच्या ठिकाणी सुरक्षा प्रदान करण्याच्या अनुषंगाने सुरक्षा संच, अत्यावश्यक संचाचे वाटप केले जाते. तसेच मंडळांनी नोंदीत सक्रिय (जिवित) बांधकाम कामगारांसाठी गृहउपयोगी वस्तू संचाच्या पुरवठा करण्याचा निर्णय घेतलेला आहे. या गृहउपयोगी वस्तू संचाद्वारे विविध स्वरूपाच्या १७ वस्तू देण्यात येणार आहेत.या योजनांचे वाटप सुलभपणे व्हावे तसेच बांधकाम कामगाराच्या आर्थिक फसवणुकीस प्रतिबंध व्हावा यासाठी या दोन्ही संचाचे वाटप एकाच ठिकाणाहून करण्याच्या अनुषंगाने पुरवठादार संस्थेमार्फत गट नंबर ११४, हॉटेल तुळजाई समोर, नामालगाव फाटा, जालना रोड बीड या ठिकाणी व्यवस्था करण्यात आलेली असून त्यासाठी खालील प्रमाणे वाटपाचे दिवस निश्चित करण्यात आलेले आहेत.

संच वाटपाचा दिवस व तालुका सोमवार- परळी, शिरूर कासार, केज, मंगळवार - अंबाजोगाई, धारूर, पाटोदा, बुधवार- माजलगाव वडवणी गुरुवार- गेवराई, आष्टी, शुक्रवार- शनिवार बीड शहर व बीड तालुका.

सदर संचाचा लाभ घेण्यासाठी नोंदी सक्रिय (जिवित) बांधकाम कामगाराकडे खालील कागदपत्रे असणे आवश्यक आहे. सुरक्षा संच व अत्यावश्यक संचासाठी लागणारे कागदपत्रे आधार कार्ड दोन प्रती, नोंदणी पावती, मंडळाची ओळखपत्र, मागणी अर्ज, गृहरोपयोगी संचासाठी लागणारे कागदपत्रे आधार कार्ड एक प्रत, नोंदणी पावती, मंडळाचे ओळखपत्र, मागणी अर्ज, हमीपत्र. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ बीड अंतर्गत नोंदीत जिवित (सक्रिय) बांधकाम कामगारांना सरकारी कामगारा अधिकारी, बीड यांच्यामार्फत आवाहन करण्यात आले आहे. वरील नमूद कागदपत्रांसह आपल्या तालुक्यासाठी नेमून दिलेल्या दिवशी वरील ठिकाणी उपस्थित राहून विनामूल्य संच उपलब्ध करून घ्यावा व कोणाकडूनही आपली आर्थिक फसवणूक होणार नाही याची दक्षता घ्यावी असे आवाहन सरकारी कामगार अधिकारी बीड यांनी केले आहे.


## जाहीरनामा

**मा.श्रीमती डी.के.पाटील ०६ वे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर बीड ता.जि. बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज नंबर ८२१/२०२४**

**कृष्णाबाई व इतर वि. निरंक विधीज्ञ आर. आर. शिंदे**

मागणीः- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस हक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत. अर्जदारः १) कृष्णाबाई भ्र पुंजाराम पवार वय ७८ वर्षे धंदा घरकाम पत्ता जुना पोष्ठ ऑफीस समोर तेली गल्ली बीड ता. जि. बीड २) विश्वेवर पि. पुंजाराम पवार वय ४८ वर्षे धंदा मजुरी रा. सदर ३) सुधारकर पि. पुंजाराम पवार वय ४१ वर्षे धंदा मजुरी रा. जुना पोष्ठ ऑफीस समोर खडकपुरा बीड ता. जि. बीड ४) आशाबाई भ्र आसाराम राऊत वय ५६ वर्षे धंदा घरकाम रा. पाली ता. जि. बीड विरुध्द निरंक वरील अर्जदार यांनी या न्यायालयात यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला. ज्याअर्थी मयत नामे पुंजीराम पि.रामभाऊ पवार हे राहणार खडकपुरा पेठबीड ता. जि. बीड यांचा मृत्यू ०५/०५/२०२४ रोजी येथे आहे. अर्जदार क. १ ही मयताची पत्नी असून असून अर्जदार क्र. २ व ३ हे मयताची मुले आहेत. तसेच अर्जदार क्र. ४ ही मयताची विवाहित मुलगी आहे.मयतास सदर अर्जदार शिवाय इतर कोणीही वारस नाहीत वरील अर्जदारांना मयताचे मृत्यूनंतर शासकीय, निमशासकीय व कार्यालयीन उपयोगाकरीता सदर वारस प्रमाणत्राची आवश्यकता आहे त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरह अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्याजाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदर कोर्टसदरह अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयत पुंजीराम पि.रामभाऊ पवार यांचे वारस असल्याबाबतचे प्रमापापत्र देण्यान येईल याची नोंद घ्यावी. सदर प्रकरणात पुढील तारीख २३/०७/२०२४ आहे. आज दिनांक १९/०६/२०२४ रोजी माझ्या संहीने व न्यायालयाचे शिक्क्याने दिले.

आदेशावरून
स्वाक्षरित
**अधिक्षक**
दिवाणी न्यायालय व. स्तर बीड

क लिपीक
सह दिवाणी न्यायालय व स्तर बीड

शिक्का

याची प्रत डकवणे : मा. दिवाणी न्यायालय व स्तर बीड यांची नोटीस बोर्डावर डकविणे कामी
तहसिल कार्यालय बीड यांच्या नोटीस बोर्डावर डकविणे कामी
नगर परिषद बीड यांच्या नोटीस बोर्डावर डकविणे कामी
मयताच्या राहत्या घरी रा. खडकपुरा ता. जि. बीड येथे डकविणे कामी



## जाहीरनामा

**मा.श्रीमती एफ.बी. बेग सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर बीड ता.जि. बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज नंबर ७९८/२०२४**

**रामेश्वर वि. निरंक विधीज्ञ आर. आर. शिंदे**

मागणीः- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस हक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत. अर्जदारः १) रामेश्वर जनार्धन रकटे वय ५५ वर्षे धंदा शेती पत्ता आहेर चिंचोली ता. जि. बीड २) नंदा भ्र मुरलीधर खांडे वय ६० वर्षे धंदा घरकाम रा. म्हाळस जवळा ता. जि. बीड,३) कालिंदा भ्र बाबासाहेब मडकर वय ५७ वर्षे धंदा घरकाम रा. जलाराम नगर बिल्डींग नंबर १ मुरबाड रोड पौर्णिमा टॉकिज समोर कल्याण, ठाणे, ४) आयोध्या भ्र आबासाहेब नेमाणे वय ७७ वर्षे धंदा घरकाम रा. जालना रोड लक्ष्मी नगर बीड ता. जि. बीड विरुध्द निरंक वरील अर्जदार यांनी या न्यायालयात यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला. ज्याअर्थी मयत नामे किसनाबाई जनार्धन रकटे हे राहणार आहेर चिंचोली ता. जि. बीड २७/१२/२०२३ रोजी येथे मयत झालेले आहेत. अर्जदार क. १ हा मयत नामे किसनाबाई जनार्धन रकटे यांचा मुलगा असून अर्जदार क. २ ते ४ हया मयताच्या विवाहित मुली आहेत. मयत नामे किसनाबाई जनार्धन रकटे यांचे निधन झालेले आहे. मयताचे नंतर अर्जदार याना शासकीय, निमशासकीय व कार्यालयीन उपयोगाकरीता सदर वारस प्रमाणत्राची आवश्यकता आहे त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरह अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्याजाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदर कोर्ट सदरह अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयत किसनाबाई जनार्धन रकटे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमापापत्र देण्यान येईल याची नोंद घ्यावी. सदर प्रकरणात पुढील तारीख २९/०७/२०२४ आहे. आज दिनांक २०/०६/२०२४ रोजी माझ्या संहीने व न्यायालयाचे शिक्क्याने दिले.

आदेशावरून
स्वाक्षरित
**अधिक्षक**
दिवाणी न्यायालय व. स्तर बीड

क लिपीक
सह दिवाणी न्यायालय व स्तर बीड

शिक्का

# परवाने नसताना कापूस बियाण्याची खरेदी-विक्री

## कृषी सहसंचालकांचे आदेश धाब्यावर बसून मालाची देवाण-घेवाण,माजलगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

**बीड । प्रतिनिधी**

कापूस बियाण्याच्या खरेदी विक्रीची परवानगी नसताना परभणी जिल्ह्यातील ज्ञानेश्वर कृषी सेवा केंद्राच्या संचालकाने माजलगाव येथील महावीर ॲग्रो एजन्सीला कापसाच्या ८६ पाकिटाची विक्री केली. याप्रकरणी कृषी विभागाच्या वतीने माजलगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाल्यानंतर आणि याची माहिती छत्रपती संभाजी नगर येथील विभागीय कृषी सहसंचालकांना दिल्यानंतर त्यांनी ही पाकिटे अधिकृत दुकानदाराला कंपनीमार्फत देण्यात यावी असे आदेश दिले होते. मात्र हे आदेश धाब्यावर बसून या दोन्ही दुकानदारांनी पाकिटाची देवाण-घेवाण केली. या प्रकरणी कृषी विभागाचे गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक कल्याण अंभोरे यांनी माजलगाव पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीत कल्याण आंबोरे यांनी म्हटले आहे की माजलगाव येथील महावीर ॲग्रो एजन्सी या दुकानदाराकडे परवाना नसताना विना विनापरवाना ज्ञानेश्वर कृषी सेवा केंद्र परभणी या नावाने दुकान चालवणारे विठ्ठल वामन अवचार यांनी महावीर एजन्सीला कापसाचे ८६ पाकिटाचे बियाणे दिले. या दोघांकडेही परवाना नसल्याने आणि गुणवत्ता नियंत्रण निरीक्षकांनी याची चौकशी केल्यानंतर हे बियाणे महावीर ॲग्रो एजन्सीने संबंधित कंपनीकडे परत पाठवून कंपनीने हे बियाणे याच तालुक्यामध्ये अधिकृत परवाना असलेल्या दुकानदारास द्यावेत आणि कृषी विभागाच्या नियंत्रणाखाली याची विक्री व्हावी असे आदेश दिले होते. मात्र हे आदेश न पाळता महावीर ॲग्रो एजन्सीने हे बियाणे ज्ञानेश्वर कृषी सेवा केंद्र परभणीला परत केले .हा व्यवहार परस्पर झाल्याने याप्रकरणी पुरवणी जबाबावरुन गुन्हा दाखल झाला आहे. या दोघांकडेही अधिकृतपणे विक्रीचा परवाना नाही तरी बिनधास्तपणे या बियाण्याची विक्री केली जात होती. या बियाण्याला स्टाफ सिल लावलेले असतानाही महावीर ॲग्रो एजन्सीने हे बियाणे ज्ञानेश्वर कृषी सेवा केंद्राला परत केले. आणि कृषी सहसंचालकाचे आदेश धाब्यावर बसवले. या प्रकरणी विठ्ठल आवचार यांच्याविरुद्ध भादवि कलम ४२०,( ३ व ७)अत्यावश्यक वस्तू अधिनियम १९५५ सह महाराष्ट्र कापूस बियाणे कायदा २००९ कलम ४(१)()(), १०(१)(२) सह कापुस बियाणे किंमत नियंत्रण आदेश- २०१५ खंड -५ सह महाराष्ट्र कापूस बियाणे पुरवठा नियमन, वितरण, विक्री व किमतीचे निश्चितीकरण कायदा २००९ अधिसूचना दिनांक ७ मे २०१० नुसार कलम ४ व ५ प्रमाणे कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे .याप्रकरणी माजलगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### कोणाचीही गय केली जाणार नाही

**बोगस बियाणे विक्री करणारे चढ्या भावाने बियाण्यांची विक्री करणारे विनापरवाना बियाण्यांची विक्री करणारे अशा कुठल्याही एजन्सी मालकाची गैर केली जाणार नाही त्यामुळे सर्वांनी योग्य भावात बियाणे विक्री करावे असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी बाबासाहेब जेजुरकर, प्रभारी उपविभागीय कृषी अधिकारी संगेवार ,कृषी विकास अधिकारी जिल्हा परिषद बीड चे गरांडे यांनी केले आहे.**



### दोघेही अनधिकृत

या प्रकरणातील विक्री करणारे ज्ञानेश्वर कृषी सेवा केंद्राचे विठ्ठल अवचार आणि बियाने खरेदी करणारे महावीर ॲग्रो एजन्सी चे मालक या दोघांकडेही खरेदी आणि विक्रीचा परवाना नसल्याने हे दोघे दोघेही अनाधिकृत दुकानदार इतके दिवस कसा काय व्यवसाय करीत होते. असा प्रश्न निर्माण होत आहे.

### अनधिकृत व्यवसायिकांचे धाबे दणाणले

या प्रकरणांमध्ये गुन्हे दाखल होत असल्याने आणी कृषी विभागाच्या वतीने तात्काळ कारवाई होत असल्याने आता चढ्या भावाने बियाने विक्री करणारे चढ्या भावाने बियाणे विक्री करणारे अशा व्यापाऱ्यांचे धाबे दणाणले असून कृषी विभागाच्या वतीने आता सर्वच ठिकाणी तपासण्या सुरू केलेल्या आहेत. कृषी विभाग सतर्क झाला असून आता कुठल्याही अनधिकृत व्यवसायिकांची गय केली जाणार नाही असे संबंधित अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे.

# कागदोपत्री योजना करुन आर्थिक गैरव्यवहार केल्याने ग्रामसेवकांवर गुन्हा दाखल करा



## पंचायत समितीसमोर उपोषणाचा ईशारा

**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टी तालुक्यातील बीडसांगवी येथील ग्रामपंचायतमध्ये १५ व्या.

वित्त आयोग व ईतर योजनांतुन केलेल्या कामांची माहिती न दिल्यामुळे गोकुळ नरवडे, सोमनाथ करडूळे, माणिक नरवडे आणि विजय डुकरे हे आष्टी पंचायत समिती कार्यालयासमोर सोमवार दि.२४ जुन रोजी अमरण उपोषण करणार असल्याचा ईशारा लेखी निवेदनाव्दारे दिला आहे. या निवेदनाच्या प्रति जिल्हाधिकारी ,

मुख्य कार्यकारी अधिकारी , तहसिदार ,गटविकास अधिकारी यांना दिल्या आहेत.या निवेदनात म्हटले आहे की,ग्रामपंचायत बीडसांगवी येथे १५ व्या. वित्त आयोग व इतर योजनेमधून बोगस केलेल्या कामाची माहिती मिळण्यासाठी विचारले असता वारंवार उडावा उडवीचे उत्तरे दिले जातात. ग्रामपंचायत। बीडसागवी येथील बोगस केलेल्या कामाची चौकशी करुन कार्यवाही करण्यात यावी.कारण बीडसांगवी आणि ग्रामपंचायत अंतर्गत कणसेवाडी, गणगेवाडी,गुंडेवाडी येथे फक्त कागदपत्रावर १५ वा. वित्त आयोग व घरपट्टी,नळपट्टी,जन्माचे नोंदीसाठी मृत्युच्या नोंदीसाठी

ग्रामसेवक चौधरी हे पैसे घेऊन काम करतात. ग्रामसेवक गावात कधीही येत नाहीत.मासिक मिटिंग, ग्रामसभा हे गावात घेत नाहीत. जर घेत असतील तर फक्त कागदोपत्री घेतात.त्यामुळे येथे भ्रष्टाचार झाला आहे. संबधित ग्रामसेवक व ज्याच्या सहयाने अर्थिक व्यवहार झाला आहे.

# श्री योगेश्वरी विश्वस्त मंडळ नूतन कार्यकारणी १६ जणांचा निवड

अंबाजोगाई । प्रतिनिधी

येथील साडे तीन शक्तीपीठापैकी अर्धे पीठ असलेली श्री योगेश्वरी देवीचे मंदिर परिसर नियोजन करण्यासाठी गेल्या अनेक वर्षापासून विश्वस्त मंडळाचा मनमानी कारभार उघडकीस येताच पूर्वीचे विश्वस्त मंडळ बरखास्त करून नवीन विश्वस्त मंडळात नवनिर्वाचित सदस्यासह काही जुन्या सदस्यांनाही पुन्हा संधी देण्यात आली आहे.



श्री योगेश्वरी देवी नवीन विश्वस्त मंडळ :

१ ) सतीश भगवानराव लोमटे २ ) प्रवीण प्रभूआप्पा दामा ३ )अजित नाथराव चव्हाण ४ ) रवी मनोहर कदम ५ ) अमोल विजयकुमार लोमटे ६ ) पृथ्विराज शिवाजीराव साठे ७ ) संजय किशनराव भोसले ८ ) राजपाल सुंदरराव भोसले ९ ) संध्या दगडूराव मोहिते जाधव १० ) राजकिशोर कांताप्रसाद मोदी ११ ) प्रा.अशोक तुळशीराम लोमटे १२ ) राजाभाऊ निवृत्तीराव लोमटे १३ ) शिरीष शिवाजीराव पांडे १४ ) हंसराज कमलाकर देशमुख १५) आ.सौ.नमिता अक्षय मुंदडा १६) श्रीराम अवधूतराव देशपांडे यांची निवड झाली आहे निवड झालेल्या सर्व विश्वस्त मंडळाचे अंबाजोगाईत अभिनंदन केले जात आहे.

# परळी शहरातील बिंगो मटका बंद करण्याची मागणी

## परळी शहर आणि संभाजीनगर पोलिसांना निवेदन

**परळी । प्रतिनिधी**

परळी शहरांमध्ये गेल्या अनेक दिवसापासून अवैद्य धंद्यांनी जोर धरला असून शहरात विविध भागात ऑनलाइन मटका सुरू आहे.सोमवार दि २४ रोजी शहरातील समस्त मुस्लिम समाजातील प्रतिष्ठित नागरिकांनी परळी शहर आणि संभाजी नगर पोलीस ठाण्यात निवेदन देत शहरात सुरू असलेला बिंगो मटका जुगार बंद करण्याची मागणी केली.



परळी शहरात विविध ठिकाणी ऑनलाइन बिंगो मटका जोरात सुरू आहे. या ऑनलाईन बिंगो मटका मुळे अनेक लोकांचे संसार उध्वस्त होत आहेत. या ऑनलाईन बिंगो च्या नादी लागुन अनेक लोक आर्तर्कदृष्ट्या कंगाल झाले असुन नैराश्य पाई लोक व्यसनाधीनही झाले आहे यामुळे घराघरात पती-पत्नीमध्ये दररोज भांडणे होत आहेत. पोलिसांनी ऑनलाईन बिंगो मटका चालकावर कारवाई केली होती. मात्र ही पान ३ वर

# समाज माध्यमाचा परत गैरवापर एका जणाविरुद्ध गुन्हा दाखल

परळी प्रतिनिधी

भाजप राष्ट्रीय सचिव पंकजा मुंडे यांच्याविषयी इन्स्टाग्रामवर अत्यंत अश्लील प्रतिक्रिया व्यक्त करुन जाणीवपूर्वक भावना दुखवणे व सामाजिक तेढ निर्माण करण्याच्या उद्देशाने सोशल माध्यमावर व्यक्त होणाऱ्या एकाविरुद्ध परळीत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलीस सुत्रांकडून प्राप्त अधिक माहितीनुसार, रविवार दि. २३रोजी रात्री ०८.च्या सुमारास आरोपी इन्स्टाग्राम आयडी धारक अभी तळेकर (१०१०) याने इन्स्टाग्रामवर पंकजा मुंडे यांचे विषयी अत्यंत अश्लील शब्दांत एक प्रतिक्रिया () टाकली. यामुळे भावना दुखावल्या जाणार आहेत तसेच दोन जातीमध्ये किंवा दोन गटात द्वेषाची भावना निर्माण हाईल याची कल्पना असताना देखील जाणीवपुर्वक इंस्ट्राग्रामवर ही पोस्ट टाकली.

याप्रकरणी पंकजा मुंडे यांच्या जगमित्र कार्यालयातील कर्मचारी पवन केशव राठोड यांच्या फिर्यादीवरून आरोपीविरुद्ध गुरनं. ९३/२०२४ कलम १५३ (अ), ५०५ (२) भादवी सह कलम ६७ प्रमाणे गुन्हा - दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सपोनी ससाणे हे करीत आहेत.

# चक्क सार्वजनिक बांधकाम कार्यालयातच भरली शाळा

## अभियंत्याची मुजोरी, शिक्षकासह सामाजिक कार्यकर्त्यास अश्लील भाषेत शिवीगाळ

**माजलगाव । प्रतिनिधी**

तालुक्यातील खतगव्हाण,पिंपरी खु,डिग्रस गावचा रस्ता उकडल्याने जिजामाता विद्यालय मोगरा येथील शेकडो विद्यार्थ्यांना गेल्या आठ दिवसापासून शाळेपासून वंचित राहावे लागत असल्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाला अनेक वेळा निवेदने करूनही रस्ता दुरुस्त न केल्यामुळे जिजामाता विद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक,पालकांनी दि २४ जुन सोमवार रोजी सकाळी १०:०० वाजल्यापासून चक्क सार्वजनिक बांधकाम कार्यालयात विद्यार्थी शिक्षक पालक व सामाजिक कार्यकर्त्यासह कार्यालयात गेल्यानंतर अभियंता नरहरे यांना भ्रमणध्वनीवरून संपर्क करून रस्त्याच्या दुरुस्तीसाठी विनंती केली असता त्यांनी भ्रमणध्वनीद्वारे शिक्षकांसह आंदोलनास पान ३ वर




**कामचुकार,भ्रष्ट अभियंता नरहरे याची मुजोरी वाढलेली असून याचा बोलवता धनी कोण आहे याचा शोध घेऊन त्याला कायदेशीर उत्तर देण्यात येईल,तसेच चार दिवसात रस्ता सुरळीत करून विद्यार्थ्यांचे होणारे शैक्षणिक नुकसान न थांबवल्यास भ्रष्ट आणि कामचुकार अभियंत्यासह कार्यालयाला कुलूप ठोकण्यात येईल.**

**-भाई ॲड.नारायण गोले पाटील, नेते शेतकरी कामगार पक्ष माजलगाव**

# पत्रकार अविनाश कदम यांना महाराष्ट्र स्वाभिमान गौरव पुरस्काराने सन्मानित




**म्हसोबावाडी। प्रतिनिधी**

मुंबई येथील जय महाराष्ट्र पत्रकार वृत्तपत्र लेखक व कवी महासंघाच्या वतीने रविवार दि २३ जून २०२४ रोजी आपण करीत असलेल्या राष्ट्र विकासाच्या उन्नतीसाठी, (पत्रकारिता) या क्षेत्रात विशेष व उल्लेखनीय कार्याचा गौरव म्हणून आपणांस महाराष्ट्र स्वाभिमान गौरव पुरस्कार - २०२४ आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचे अध्यक्ष तथा लोकमत व मराठवाडा साथी दैनिकाचे आष्टी तालुका प्रतिनिधी अविनाश कदम यांना छत्रपती शिवाजी महाराज यांचे वंशज श्रीमंत संभाजीराजे जाधवराव व सिने अभिनेत्री स्मिताताई भोसले/धुमाळ यांच्या हस्ते राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी आरोग्य मित्र सुभाष गायकवाड, पान ३ वर

# मराठी पत्रकार परिषद आणि व्यापारी महासंघाच्या वतीने वृक्षारोपण



**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरांमधील सिद्धिविनायक व्यापारी संकुल परिसरातील डॉक्टर चरखा ते स्टेडियम गेट कॉर्नर पर्यंत असणाऱ्या रस्त्याच्या दुतर्फा वृक्षारोपण करण्यात आले. मराठी पत्रकार परिषद आणि व्यापारी महासंघाच्या वतीने हा उपक्रम सोमवार दिनांक २४ जून रोजी राबविण्यात आला. वड, गुलमोहर, आंबा, लिंब, सिसम या सह विविध प्रकारचे १५ फूट उंचीचे वृक्षांची लागवड करण्यात आली.

मराठी पत्रकार परिषद आणि व्यापारी महासंघाच्या वतीने शहरांमध्ये विविध समाज उपयोगी उपक्रम नियमितपणे राबवले जातात. यंदाच्या मान्सून हंगामात शहरातील मध्यवर्ती परिसरात असणाऱ्या सिद्धिविनायक व्यापारी संकुल समोरील रस्त्यांच्या दुतर्फा वृक्षारोपणाचा उपक्रम राबविण्यात आला. यावेळी मराठी पत्रकार परिषदेचे जिल्हाध्यक्ष विशाल साळुंके, व्यापारी महासंघाचे हनुमान पवळ, नगरसेवक अमर नाना नाईकवाडे, मराठी पत्रकार परिषदेचे जिल्हा उपाध्यक्ष रवी उबाळे, व्यापारी महासंघाचे राजेश कुलकर्णी, शंकर गायकवाड, जीवन शर्मा, दत्ता रायते, विशाल चाळक, तिवारी, यादव, विकास मिटकर, शंकर सुरवसे यांनी विविध प्रकारच्या १५ फूट उंचीचे झाडांचे रोपण केले.

# परळीच्या कन्येचे दैदिप्यमान यश

**परळी । प्रतिनिधी**

राजुरी पुणे येथील सह्याद्री व्हॅली अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान महाविद्यालयात शिक्षण घेत असलेल्या परळी येथील कन्येने अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रम अंतिम वर्षात दैदिप्यमान यश संपादन केले. या यशाबद्दल सर्वत्र तिचे अभिनंदन होत आहे.

परळी येथील प्रसिद्ध सोन्या-चांदीचे व्यापारी रमेश धारासुरकर यांची कन्या कु.स्नेहल ही पुण्याच्या प्रख्यात अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान महाविद्यालयात इलेक्ट्रॉनिक अँड टेली कम्युनिकेशन या शाखेत बी.ई पदवी अभ्यासक्रमात ९२ टक्के गुण घेत विशेष प्राविण्य श्रेणीत उत्तीर्ण झाली.



कु.स्नेहल च्या या दैदिप्यमान यशाबद्दल तिचे सर्वत्र कौतुक करण्यात येत असून अतिशय प्रतिकूल परिस्थितीत ध्येय आणि चिकाटीने तिने हे यश संपादन केले आहे.

# बीडमध्ये एमबीबीएस शिक्षणासाठी मेडिकल कॉलेजची मागणी

**बीड । प्रतिनिधी**

बीड येथे नवीन वैद्यकीय महाविद्यालय व्हावे यासाठी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी आज नवी दिल्ली येथे केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री ( स्वतंत्र प्रभार आयूष) प्रतापराव जाधव यांची भेट घेतली आहे या भेटीत मंत्री महोदयांनी सकारात्मकता दाखवली असून लवकरच यावर योग्य निर्णय घेणार असल्याचे ते म्हणाले

केंद्र सरकारच्या धोरणानुसार प्रत्येक जिल्ह्यात स्वतंत्र वैद्यकीय महाविद्यालय व्हावे अशी केंद्र सरकार ची योजना आहे,त्यानुसार बीड जिल्ह्याची लोकसंख्या ३१ लाख असून आणखी एका वैद्यकीय महाविद्यालयाची नितांत आवश्यकता आहे,सध्या एक हजार खाटा उपलब्ध असून बीड मधील रुग्णालयातील एकूण खाटांची संख्या लक्षात घेता बीड शहरात स्वतंत्र वैद्यकीय महाविद्यालयाची आवश्यकता आहे बीड जिल्ह्यात असलेल्या एका महाविद्यालयात म्हणजेच अंबाजोगाई येथे मोठ्या प्रमाणात रुग्णसंख्या असते त्यामुळे अनेक रुग्णांना लातूर किंवा संभाजीनगर या ठिकाणी जावे लागते बीड शहरात वैद्यकीय महाविद्यालयाची अत्यंत गरज असून हे महाविद्यालय व्हावे यासाठी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर पान ३ वर



**माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी घेतली केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री जाधव यांची भेट**

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...
पुणे विशेष
मंगळवार दि.२५ जून २०२४ । पान ७

# सत्ताधाऱ्यांमुळेच पुणे 'ड्रग्ज-पब्ज'चे माहेरघर-जयंत पाटील

**पुणे । प्रतिनिधी**

'विद्येचे माहेरघर' अशी ओळख असलेल्या पुण्याची नवी ओळख 'ड्रग्ज व पब्जचे माहेरघर' अशी होत असून, यामागे सध्याच्या सत्ताधाऱ्यांचा नाकर्तेपणा जबाबदार आहे, असा आरोप शरद पवार गटाचे नेते जयंत पाटील यांनी केली आहे.



जयंत पाटील यांनी एक्स पोस्टच्या माध्यमातून सत्ताधारी भाजप-शिंदे गटावर निशाणा साधला आहे. त्यांनी आपल्या द पोस्टमध्ये म्हटलं आहे की, गेली काही वर्षे पुण्यात गुन्हेगारीने उच्चांक गाठला असून, देशभर गाजलेल्या ललित पाटील प्रकरणानंतर काल पुण्यात काही अल्पवयीन मुलांचे हॉटेल मध्ये ड्रग्ज सेवन करतानाचे व्हिडियो व्हायरल झाल्यावर पुणे पोलिसांना जाग येऊन पोलिसांनी त्याठिकाणी छापा टाकला. थोडक्यात काय तर पोलिसांना गुन्ह्यांची माहिती आता त्यांच्या खबऱ्यांकडून मिळत नसून ती सोशल मीडियावर मिळत आहे.

अगरवाल पॉर्शे कार अपघात प्रकरणात तर थेट मुलाच्या रक्ताच्या जागी मुलाच्या आईचे रक्त बदलून ठेवण्यात आले. पैशांच्या जोरावर व्यवस्थेला कशाप्रकारे वाकवले जाते, याचे समोर आलेले हे एकमेव उदाहरण आहे. लोकांच्या नजरेसमोर कधीही आले नाहीत, असे हजारो प्रकार असावेत. 'विद्येचे माहेरघर' अशी ओळख असलेल्या पुण्याची ओळख 'ड्रग्ज व पब्जचे माहेरघर' अशी होत असून यामागे सध्याच्या सत्ताधाऱ्यांचा नाकर्तेपणा जबाबदार आहे. पुणे शहर हे छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिराव फुले, लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांचे शहर आहे. मूळ पुण्याची जगभर असलेली ओळख पुसून जाऊन हे शहर आज सत्ताधारी भाजपा शिंदे गटाच्या सरकारमुळे बदनाम होत आहे. असेही जयंत पाटील यांनी आपल्या पोस्टमध्ये नमूद केले आहे.

# अडीच लाख मुलांच्या शिक्षणाचा खेळखंडोबा थांबवा; 'आप'चे आंदोलन

पुणे । प्रतिनिधी

आरटीई खासगी शाळांमधील राखीव जागा प्रवेशासंदर्भात सरकारने चुकीचा आदेश काढला. तो शिक्षण हक्कविरोधी असल्यामुळे कोर्टाने त्याला स्थगिती दिली. परंतु, सरकारने तो अजूनही मागे घेतलेला नाही. त्यामुळे प्रवेश प्रक्रिया अजूनही कोर्टात रेंगाळली आहे. हा आदेश सरकारने तातडीने मागे घेऊन प्रवेश प्रक्रिया सुरू करावी, या मागणीसाठी आप पालक युनियन, आम आदमी पार्टीच्या नेतृत्वात पालकांनी रविवारी (दि.२३) बालगंधर्व चौकात आंदोलन केले.




यंदा आरटीई प्रवेश प्रक्रिया तब्बल दोन महिने रखडली आहे. शासनाने काढलेल्या आदेशाला उच्च न्यायालयाने शिक्षण हक्क विरोधी ठरवत स्थगिती दिली. परंतु, शासनाने कायदा अधिसूचना मागे न घेतल्याने त्याबाबत खासगी शाळा विविध हस्तक्षेप याचिका दाखल करत आहेत. त्यांच्या सुनावणीला तारखा पडत असल्याने शाळा प्रवेश लॉटरी जाहीर करण्यास कोर्टाने मनाई केली आहे. या खासगी राखीव जागांवरील प्रवेशाच्या अपेक्षेने जवळपास अडीच लाख पालकांनी अर्ज भरले असून त्यांची मुले या प्रवेश प्रक्रियेची वाट पाहात आहेत.

सध्या सर्व खासगी शाळा आणि सरकारी शाळा सुरू झालेल्या आहेत. या शालाबाह्य अडीच लाख मुलांना खासगी शाळांमध्ये लॉटरी लागून प्रवेश मिळेल की नाही याची शाश्वती नाही. त्यामुळे पालक द्विधा मन:स्थितीत आहेत. इतर मुले शाळेत जाऊ लागल्याने मोफत प्रवेशाची वाट पाहात असलेल्या मुलांच्या मानसिकतेवर परिणाम होत आहे, याला शिक्षणमंत्री केसरकर आणि युती सरकारच जबाबदार आहे, असा आरोप मुकुंद किर्दत यांनी केला. तर आदेश मागे न घेतल्यास शिक्षणमंत्री केसरकर यांना पुण्यात फिरू देणार नाही, असा इशारा सुदर्शन जगदाळे यांनी दिला.

## निघोजेतील कंपनीत दोन कोटींचा अपहार; पाच जणांवर गुन्हा

चाकण । प्रतिनिधी

येथील औद्योगिक वसाहतीतील निघोजे (ता. खेड) येथील मिंडा वास्ट क्सेस सिस्टम प्रा. लि. कंपनीत काम करणाऱ्या आरोपींनी व इतर आरोपींनी खोटी चलने तयार करून सुमारे दोन कोटी ४५ लाख रुपयांची फसवणूक केली. या प्रकरणी आरोपी सौरभलक्ष्मी प्रसाद उपाध्याय (वय-३६, रा. चाकण, जिल्हा पुणे) उपेंद्र शुक्ला (वय ४४, रा. मोशी, जि. पुणे), विजय भोसले, अरुणकुमार, श्री गणेश ट्रान्सपोर्टचा मालक नाव पत्ता माहीत नाही. या पाच आरोपींवर विविध कलमानुसार गुन्हा दाखल केला आहे.

महाळुंगे पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक नितीन गीते यांनी दिलेल्या माहितीनुसार, पोलिसांत फिर्याद रवींद्र जगदाळे (वय ४०, रा. पुनावळे, जि. पुणे) यांनी दिली आहे. फिर्यादी जगदाळे यांच्या कंपनीत काम करणारे आरोपी सौरभ प्रसाद उपाध्याय, उपेंद्र शुक्ला यांनी मिळून ट्रान्सपोर्ट करता लागणाऱ्या रुपयांमध्ये तसेच खरेदी आयात चलनामध्ये वजनापेक्षा जास्त वजनाचे बिल तयार करून जे सप्लायर कंपनीला कोणतीही सर्व्हिस प्रोव्हाईड करीत नाही, अशा जामता इंजिनिअरिंग व गणेश ट्रान्सपोर्टकडे कंपनीचे पैसे वळते केले. क्शन एक्सप्रेसचे संचालक विजय भोसले यांच्यासोबत मिळून चलनामध्ये वजनापेक्षा जास्तीचे वजन चलनामध्ये दाखवून व खोटे चलन तयार करून आरोपींनी संगनमत करून २०१८ ते २०२३ या दरम्यान कंपनीची दोन कोटी ४५ लाख रुपये रक्कमेचा अपहार करून फसवणूक केली आहे, असे फिर्यादीत म्हटले आहे.

# पुणेकरांसाठी वाहतूक व्यवस्थेत बदल, 'हे' असणार पर्यायी मार्ग

**पुणे । प्रतिनिधी**

अंगारकी संकष्टी चतुर्थीनिमित्त मंगळवारी (ता. २५) शिवाजी रस्त्यावरील श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंदिर येथे दर्शनासाठी भाविकांची गर्दी होते. शिवाजी रस्त्यावरील वाहतूक कोंडी टाळण्यासाठी वाहतुकीत तात्पुरत्या स्वरूपात बदल करण्यात येणार आहेत.



पीएमपी बसेस, चारचाकी आणि जड वाहनांना शिवाजी रस्त्यावर मंगळवारी गर्दी संपेपर्यंत बंदी राहील. आवश्यकतेनुसार चारचाकी आणि दुचाकी वाहनांवर लाल महाल चौकापासून निर्बंध राहतील. वाहतुकीची परिस्थिती पाहून वाहतूक वळविण्यात येणार आहे. या कालावधीत खालील पर्यायी मार्गाचा वापर करावा, असे आवाहन शहर वाहतूक शाखेचे पोलिस उपायुक्त रोहिदास पवार यांनी केले आहे.

पर्यायी मार्ग

-पूरम चौकातून बाजीराव रस्त्यावरून शिवाजीनगरकडे जाणाऱ्या वाहन चालकांनी पूरम चौकातून टिळक रस्त्याने टिळक (अलका टॉकीज) चौक आणि पुढे नामदार गोपाळकृष्ण गोखले (एफसी) रस्त्याने इच्छितस्थळी जावे. -शिवाजी रस्त्यावरून स्वारगेटला जाणाऱ्या वाहन चालकांनी स.गो. बर्वे चौकातून जंगली महाराज रस्त्याने खंडोजीबाबा चौक- टिळक चौकातून टिळक रस्त्याने इच्छितस्थळी जावे. -स. गो. बर्वे चौकातून पुणे मनपा भवनाकडे जाणाऱ्या वाहन चालकांनी स.गो. बर्वे चौकातून जंगली महाराज रस्त्याने झाशी राणी चौक डावीकडे वळून इच्छितस्थळी जावे.-अप्पा बळवंत चौकातून बुधवार चौकाकडे जाणाऱ्या वाहन चालकांनी बाजीराव रस्त्याने सरळ पुढे इच्छितस्थळी जावे.

## रायगडावर विवेकानंद केंद्राच्या उपक्रमाचा शुभारंभ

**पुणे । प्रतिनिधी**

'छत्रपती शिवाजी महाराज की जय', 'स्वामी विवेकानंद की जय' या जयघोषात दुर्ग दुर्गेश्वर रायगड दुमदुमला. विवेकानंद केंद्र कन्याकुमारी महाराष्ट्र प्रांताच्या युवा नेतृत्व विकसन उपक्रमाचे आयोजन केले होते. रविवारी (ता. २३) रायगडावर या उपक्रमाचा शुभारंभ झाला. या वेळी राज्यभरातून आलेले ३४० युवक-युवतींची उपस्थिती होती. या वेळी युवकांनी गडावर चढाई करताना प्लास्टिक गोळा केले.

विवेकानंद केंद्र महाराष्ट्र प्रांताकडून गेल्या २९ वर्षांपासून महाविद्यालयीन युवक-युवतींच्या व्यक्तिमत्त्व व नेतृत्व विकसनासाठी युवा नेतृत्व विकसन उपक्रम राबविण्यात येत आहे. हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेकास ३५० वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त यंदा युवा नेतृत्व विकसन उपक्रमांतर्गत ज्येष्ठ पत्रकार अरुण करमरकर लिखित 'अष्टावधानी शिवराय' या पुस्तकावर आधारित परीक्षा घेण्यात येणार आहे. या पुस्तकासह भित्तिपत्रकाचे केंद्राच्या प्रांत संघटक सुजाता दळवी, प्रांत युवाप्रमुख सुनील कुलकर्णी यांच्या हस्ते प्रकाशन झाले.

सुनील कुलकर्णी यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. या वेळी प्रांत सहसंघटक सुमीत शिवहरे, निधी संकलन प्रमुख संजय कुलकर्णी, कार्यपद्धती प्रमुख मदगोंडा पुजारी आदी उपस्थित होते. प्रास्ताविक लखन अवस्थी यांनी केले. केंद्र प्रार्थनेने कार्यक्रमाचा समारोप झाला.

# पाणी आणण्यासाठी गेलेल्या मुलीचा पाय घसरून मृत्यू



**पुणे । प्रतिनिधी**

इंदापूर तालुक्यातील राजवडी पाटी येथे पंधरा वर्षीय मुलगी विहिरीत पाय घसरुन बुडाली यात तिचा दुर्दैवी मृत्यू झालाय..सारिका पिराजी शिंदे असं या मुलीचं नांव असून आज सकाळी साडेसात वाजण्याच्या सुमारास सारिका या विहिरीवरती पाणी आणण्यासाठी गेली होती.. पाण्यावर आणण्यासाठी गेलेली मुलगी माघारी येत नाही म्हणून सकाळी साडेसात वाजल्यापासून या मुलीचा शोध घेतला जात होता तबल साडेसहा तासानंतर या मुलीचा मृतदेह बाहेर काढण्यात यश आले आहे. सारिका पिराजी शिंदे वय १५ वर्षे (राहणार परतुर,ता. परतुर जिल्हा. जालना) ही मुलगी आज सकाळी साडेसात वाजता (राजवडी ता. इंदापूर) येथील विहिरी वरती पाणी भरणे कामी गेली असताना पाय घसरून पाण्यात बुडाल्याचा अंदाज व्यक्त केला जात होता.. पोलीस प्रशासन महसूल यंत्रणा आणि स्थानिक नागरिकांच्या मदतीने विहिरीतील पाण्याचा साठा बाहेर काढून या मुलीचा मृतदेह बाहेर काढण्यात आला.

## मंजिरीज् योग वर्गातर्फे 'योगा नृत्य' कार्यक्रम

**पुणे । प्रतिनिधी**

सिंहगड रस्त्यावरील 'मंजिरीज् योग वर्गा'तर्फे जागतिक योगदिनानिमित्त आर. एस. स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स येथे 'योगा नृत्य' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. महिलांना योग कशा पद्धतीने करावा, याचे मार्गदर्शन करत महिषासुरमर्दिनी स्तोत्रावर आणि आदियोगी रचनेवर योगसाधकांनी 'योगा नृत्य' सादर केले. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून उपनिषदांचे अभ्यासक आदित्य शेंडे, आहारतज्ज्ञ जान्हवी अक्कलकोटकर, योग वर्गाच्या संचालिका मंजिरी दामले आदी उपस्थित होते. विनया देशपांडे व तन्वी गोडबोले यांनी सूत्रसंचालन केले.

# पुणे ड्रग्जच्या विळख्यात? नामांकित मॉलमध्ये ड्रग्स सेवन; दोन तरुणींचा व्हिडीओ व्हायरल

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यातील L3 बार ड्रग्स पार्टी प्रकरण उघडकीस आलं असताना आता मॉलमधील ड्रग्स सेवन करतानाचा नवीन व्हिडओ समोर आला आहे. फर्ग्युसन रस्त्यावरील ड्रग्स सेवन करतानाचा व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर तसाच एक व्हिडीओ व्हायरल झाला आहे. या व्हिडीओमध्ये दोन तरुणी अंमली पदार्थांचे सेवन करत असल्याचं दिसत आहे. पुणे-नगर रस्त्यावरील एका मॉलमध्ये दोन तरुणी ड्रग्स सेवन करतानाचा व्हिडीओ समोर आला आहे. या व्हायरल व्हिडीओमध्ये दोन तरुणी ड्रग्स सेवन करताना दिसत आहेत. पुणे-नगर रस्त्यावरील मॉलमधील हा व्हिडीओ असल्याचं समजतंय.

नामांकित मॉलमध्ये ड्रग्स सेवन

या व्हिडीओवरुन पुन्हा एकदा पुण्यातील ड्रग्स कनेक्शन समोर येताना दिसत आहे. यामुळे पुण्यात मोठ्या प्रमाणात ड्रग्स सेवन होत असल्याचं दिसून येत आहे. पुण्याला ड्रग्सचा विळखा पडल्यचा आरोप अनेक वेळा विरोधक, सामाजिक संघटना आणि संस्थांकडून आरोप होतात. पण, गेल्या दोन दिवसांपासून पुण्यातील जे व्हिडीओ व्हायरल झाले आहे, त्यावरुन हे प्रकरण किती गंभीर आहे, हे पुन्हा एकदा स्पष्ट होताना दिसत आहे.




दोन तरुणींचा व्हिडीओ समोर

हा व्हिडीओ काही दिवसांपूर्वीचा असल्याचं समोर आलं आहे. मात्र, आता हा व्हिडीओ व्हायरल होत आहे. एफसी रोडवरील एल३ म्हणजेच लिक्विड लेजर लाऊंज या पबमध्ये ड्रग्स पार्टी झाल्याचं समोर आल्यानंतर एका प्रथमदर्शीने त्यावेळी मॉलमधील ड्रग्स सेवनाचा व्हिडीओ समोर आणला आहे. या व्हिडीओ दोन तरुणी मोबाईलवर कोकेन सदृश्य अंमली पदार्थ ठेवून त्याचं सेवन करताना दिसत आहेत.

## आळे येथे विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप

**आळेफाटा । प्रतिनिधी**

आळे येथील गरजू विद्यार्थ्यांना मोफत वह्यांचे वाटप केले. आळे (ता. जुन्नर) येथील अनेक मुलांना घरची परिस्थिती हलाखीची असल्याने त्यांच्या शालेय साहित्याचा खर्च परवडत नाही. ही बाब सामाजिक कार्यकर्ते जयवंत शिरतर यांचे लक्षात आल्याने त्यांनी ७४ विद्यार्थ्यांना प्रत्येकी अर्धाडझन असे ५४ डझन वह्याचे मोफत वाटप केले. याप्रसंगी आळे येथील आद्यक्रांतीवीर राजे उमाजी नाईक प्रतिष्ठानचे सर्व सदस्य व शालेय विद्यार्थी उपस्थित होते.

# पांढऱ्या शिधापत्रिकाधारकांना ५ लाखांचे आरोग्य कवच

## ४३ हजारांपेक्षा अधिक कुटुंबीयांना मिळणार लाभ

पिंपरी । प्रतिनिधी

शहरातील ४३ हजार ६०५ शुभ्र (पांढरे) शिधापत्रिका असणार्या कुटुंबीयांना दरवर्षी ५ लाख रुपयांचे आरोग्य कवच मिळणार आहे. राज्य सरकारने नव्याने जारी केलेल्या शासन निर्णयानुसार महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजनेचा लाभ त्यांना मिळेल. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या २६ फेब्रुवारी २०१९ च्या शासन निर्णयानुसार महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना व आयुष्मान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना यांची सांगड घालून त्या राज्यामध्ये एकत्रितपणे राबविण्याचा निर्णय घेतलेला आहे.




यापूर्वी केशरी शिधापत्रिका आणि अंत्योदय शिधापत्रिका असणार्या रेशनकार्डधारकांनाच या योजनेचा लाभ मिळत होता. आता पांढरी शिधापत्रिका असणार्या नागरिकांनाही या योजनेचा लाभ देण्याचा शासन निर्णय नव्याने जारी करण्यात आलेला आहे. पांढरी शिधापत्रिका असणार्या कुटुंबांना महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजनेचा लाभ देण्यासाठी आयुष्मान कार्ड निर्माण करण्यासाठी संबंधित शिधापत्रिका आधारकार्डशी संलग्न करणे आवश्यक आहे. त्याची कार्यवाही सुरू करण्यात यावी, असे आदेश राज्यातील सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी, सर्व अन्नधान्य वितरण अधिकारी, सर्व उपनियंत्रक (शिधावाटप, मुंबई) यांना अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या वतीने देण्यात आले आहेत.

# लोकसभेत यश; पण शरद पवार सावध

**पुणे । प्रतिनिधी**

पिपाणी चिन्हामुळे लोकसभा निवडणुकीत मोठा फटका बसल्यानंतर शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने अगदी सावध पवित्रा घेतला आहे. आगामी विधानसभा निवडणुकीत पिपाणीचा धोका टाळण्यासाठी पवार गटाने निवडणूक आयोगात धाव घेतली असून पिपाणी हे चिन्ह निवडणुकीच्या चिन्हाच्या यादीतून वगळण्यात यावे, अशी पवार गटाची मागणी आहे. लोकसभा निवडणुकीत तुतारी घेऊन मैदानात उतरलेल्या राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाला पिपाणीमुळे मोठा फटका बसला. तुतारी अन् पिपाणी चिन्ह सारखे असल्यामुळे शरद पवार यांच्या उमेदवारांना खूप मोठा फटका बसला. तसेच राष्ट्रवादीची सातारा लोकसभेची जागाही चिन्हाच्या घोळामुळे गमवावी लागली, यामुळेच राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाने पिपाणीविरोधात निवडणूक आयोगात धाव घेतली आहे. पिपाणी हे चिन्ह निवडणुकीच्या चिन्हाच्या यादीतून वगळण्यात यावे, अशा मागणीचे पत्र निवडणूक आयोगाला लिहले आहे. पिपाणी चिन्हांमुळे लोकसभेत फटका बसल्यानंतर पवार गटाकडून निवडणूक आयोगाकडे ही विनंती करण्यात आली असून निवडणूक आयोगाने योग्य निर्णय न घेतल्यास पवार गट सुप्रीम कोर्टात जाणार आहे.



# बसचालकाला मारहाणप्रकरणी दोघांवर गुन्हा दाखल

वडगाव निंबाळकर । प्रतिनिधी

येथील बसस्थानकात बस विळवताना खाद्य स्टॉल गाडी धक्का लागला. त्यामुळे बसचालकाला स्टॉलधारकांनी मारहाण केली. रविवार (ता. २३) दुपारी तीनच्या सुमारास हा प्रकार घडला.

याप्रकरणी वडगाव निंबाळकर (ता. बारामती) येथील कैलास प्रभाकर शेलार, श्रीकांत कैलास शेलार या पिता-पुत्रावर मारहाणीचा गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत एसटीचालक शांताराम माणिकराव जगताप (रा.चोपडज, ता. बारामती) यांनी पोलिसात फिर्याद नोंदवली आहे.



फिर्यादीत नीरा-बारामती मार्गावरून वडगाव निंबाळकर येथील बसस्थानकामध्ये बस वळविताना चेतना फूड कार्नर गाडीला धक्का लागला. त्यावेळी खाद्यतेल खाद्यबनविणाऱ्याच्या हातावर उडले. त्यावेळी बस चालकाने दुखापग्रस्त व्यक्तीला दवाखान्यात नेण्याचा प्रयत्न केला. गाडी मालकांनी त्या बसचालकाला मारहाण केली. कंपनीने निर्धारित केलेल्या वाहन रचनेत फेरबदल करून फिरता स्टॉल बनविलेला आहे. तो अनधिकृतपणे उभा केलेला होता, याबाबत मारहाणी व सरकारच्या कामात अडथळा आणल्याप्रकरणी त्यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे.